रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ८६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ मंगळवार, १३ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
विवाहितेच्या मृत्यूप्रकरणी पतीसह पाच जणांवर गुन्हा/२
वारली चित्रकलेतून संस्कृतीचे जतन/६
रवींद्र जडेजाचे रणजी ट्रॉफीत दमदार शतक/८

## महाराष्ट्रातील एसआयआर प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ

**मुंबई :** महाराष्ट्रामध्ये राबवण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाला अर्थात एसआयआर यादीला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जर नागरिकांचे प्रारूप मतदार यादीमध्ये नाव नसेल अशा नवमतदारांना आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. यामुळे नवीन मतदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्रातील मतदारांना पाठवण्यात आलेल्या नोटिसींना उत्तर देण्यासाठी आणि एसआयआर यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी २६ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. हीच मुदत पूर्वी १२ ऑक्टोबरपर्यंत होती. निवडणूक आयोगाने दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी मुदतवाढ दिली असली तरीही मात्र अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणे म्हणजेच १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.



# विरोधकांचे कृत्य संविधानविरोधी –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्याची मागणी करत काँग्रेस नेते राहुल गांधींच्या नेतृत्वात इंडिया आघाडीच्या खासदारांचा मोर्चा दिल्लीत निघाला, तर इकडे मुंबईत ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) आणि मुख्य निवडणूक आयुक्त यांच्याविरोधात आंदोलन करण्यात आले. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली आहे.

काँग्रेस पक्षाने जे काही चालवले आहे ते पूर्णपणे संविधानविरोधी आहे. संविधान हातात घ्यायचे आणि संविधानाने निर्माण झालेल्या संस्थांना बदनाम करणे सुरू आहे. सर्वोच्च न्यायालय, कॅग, आरबीआय अशा संस्था कुचकामी आहेत असे दाखवायचे, लोकांना त्या विरोधात भडकवायचे. आता संविधान बदलावे लागेल हे शेवटी सांगायचे. अतिडावी विचारसरणी प्रस्थापित करण्याचे



हे षड्यंत्र आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशाचे संविधान नाकारण्याचे काम राहुल गांधी आणि त्यांच्या आघाडीने केले आहे. सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढू. सरन्यायाधीशांनी आमची भेट घेतली पाहिजे, निवेदन स्वीकारले पाहिजे हे कुठल्या संविधानात लिहिले आहे?

सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचे काम जाणीवपूर्वक चालले आहे. तुम्ही कुठल्याही विचारसरणीचे असाल तरीही सरन्यायाधीशांनी अशा प्रकारे मोर्चाला सामोरे जाणे हे संविधानाला धरून आहे का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान लिहिले त्याला अपेक्षित आहे का? भारतीय संविधानानुसार अशा पद्धतीने सर्वोच्च न्यायालयाचा अपमान करता येतो का? असे प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांना केले. सर्वोच्च न्यायालयालाही कमकुवत करण्याचा प्रयत्न यांचा आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले संविधान नाकारणे हाच यांचा डाव असल्याचा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला.

१९७५मध्ये राहुल गांधींच्या आजी इंदिरा गांधींनी संविधान संशोधन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे मूलभूत अधिकार दिले होते ते गोठवले होते. आम्ही त्यावेळीही संघर्ष केला होता व आम्ही पुन्हा संघर्ष करीत आहोत. डॉ. आंबेडकर यांच्या संविधानाला आम्ही हात लावू देणार नाही, असा इशारा यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिला.

### अराजक माजवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न

जंतरमंतर या ठिकाणी जेव्हा अराजकता सुरू होती तेव्हा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अल्गोरिदम सेट झाले होते आणि तसाच कंटेट त्यावेळी येत होता. या सगळ्या प्लॅटफॉर्मन्सनी हे मान्य केले की आम्हाला त्या पोस्टसाठी पैसे मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पोस्ट काढून टाकण्यात आली होती, त्याबाबत 'मेटा'ने माफीही मागितली होती. काँग्रेस पक्ष सातत्याने हरल्याने आणि जिंकण्याची त्यांना काही आशा वाटत नाही म्हणून अशा पद्धतीने अराजक माजवण्याचा काँग्रेसचा डाव आहे. आम्ही हा डाव यशस्वी होऊ देणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

# रायगडातील पाच समुद्र किनाऱ्यांवर रोबोटिक बोयाचे सुरक्षा कवच!

## गृहरक्षक दलाचे १७५ जवानही होणार तैनात

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर पुण्यातील आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेची दखल घेत राज्य शासनाने समुद्र किनाऱ्यांवरील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील पाच समुद्र किनाऱ्यांवर रोबोटिक बोया उपलब्ध करून देण्यात आले असून पर्यटकांच्या मदतीसाठी गृहरक्षक दलाचे १७५ जवानही तैनात केले जाणार आहेत.

कोकणातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटक बुडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने रोबोटिक बोया उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला



आहे. दिवेआगर येथील आठ विद्यार्थ्यांच्या मृत्यूआधी रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे समुद्र किनाऱ्यावर पाच पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला होता तसेच नाणार खाडी परिसरात कालवे पकडण्यासाठी गेलेल्या चार भावंडांचाही बुडून मृत्यू झाला होता. या घटनांनंतर समुद्र किनाऱ्यांवरील सुरक्षा व्यवस्थेकडे लक्ष वेधले गेले.

यानुसार रायगड जिल्ह्यासाठी पाच रोबोटिक बोया प्राप्त झाले आहेत. पालकमंत्री भरत गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत या बोयांचे लोकार्पण करण्यात आले. त्यापैकी अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन नगरपालिकांना प्रत्येकी एक, तर दिवेआगर आणि काशीद ग्रामपंचायतींना प्रत्येकी एक रोबोटिक बोया देण्यात आला आहे.

यापूर्वी रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागाव, काशीद आणि हरिहरेश्वर या समुद्र किनाऱ्यांसाठी तीन रोबोटिक बोया उपलब्ध करून दिले होते. **(पान २ वर..)**



## ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**

मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री मधु कांबीकर यांचे सोमवारी (दि.१२) दीर्घ आजाराने निधन झाले. वयाच्या ७३व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कांबीकर यांच्या निधनामुळे मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

मधु कांबीकर यांनी कारकिर्दीच्या सुरुवातीला वगनाट्यांमधून काम केले. त्यांनी नाटक, सिनेमा माध्यमातून अमाप लोकप्रियता मिळवली. लावणी कलावंत म्हणूनही ओळख होती. नोव्हेंबर २०१६मध्ये मुंबईतील एका कार्यक्रमात लावणीचे सादरीकरण करताना त्या बेशुद्ध झाल्या. तेव्हापासून त्या अंथरुणावर खिळून होत्या. अखेर सोमवारी दीर्घ आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीतील अनेक मान्यवरांनी आणि त्यांच्या चाहत्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

# विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणाविरोधात भाजप महिला मोर्चाचे आंदोलन

### पनवेलमध्ये घोषणाबाजी करीत नोंदविला निषेध

### काँग्रेस खासदारावर कारवाईची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणप्रकरणी काँग्रेसविरोधात सोमवारी (दि.१२) भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा उत्तर रायगडच्या वतीने पनवेलमध्ये तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस खासदार डॉ. विमोल अकोइजम यांच्यावरील



विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप आणि त्यासंदर्भातील कारवाईचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

भाजपच्या पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालय येथे जोरदार घोषणाबाजी करत काँग्रेस पक्षाचा निषेध नोंदवण्यात आला तसेच काँग्रेस खासदार डॉ. विमोल अकोइजम यांच्यावर कारवाईची मागणी करत या गंभीर प्रकरणावर काँग्रेसचे वरिष्ठ नेतृत्व मौन का बाळगून आहे, असा संतप्त सवाल महिला मोर्चाकडून विचारण्यात आला.

या आंदोलनामध्ये भाजपच्या जिल्हा सरचिटणीस व माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, पनवेल महापालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, भाजप महिला मोर्चा पनवेल शहरध्यक्ष तथा नगरसेविका रूचिता लोंढे, नगरसेविका दर्शना भोईर, दमयंती भोईर, प्रियांका कांडपिळे, सरस्वती काथारा, राजश्री वावेकर, प्रीती जॉर्ज, श्वेता बहिरा, शिवानी घरत, माजी नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, सारिका भगत, दीक्षा जाधव, राणी म्हात्रे, शिल्पा म्हात्रे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## निवडक

### जंतरमंतरवरील आंदोलनाची मान्यता रद्द; पर्यायी जागा

**नवी दिल्ली :** येथील पोलिसांनी जंतरमंतरला आंदोलनाचे अधिकृत ठिकाण म्हणून दिलेली मान्यता रद्द केली आहे. याऐवजी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि सीबीडी मैदान येथे शांततेत आंदोलन करता येणार आहे. नवीन व्यवस्थेमुळे राजधानीतील वाहतूक सुरळीत राहण्यास आणि आंदोलनांचे योग्य व्यवस्थापन होण्यास मदत होणार आहे.

### एमपीएससी पेपर लीकप्रकरणी आरोपी मयूर ठाकरेला अटक

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षा पेपर लीक प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने कारवाई करत आणखी एका वॉण्टेड आरोपीला अटक केली आहे. मयूर चंद्रकांत ठाकरे असे या आरोपीचे नाव असून त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता १७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या ताज्या कारवाईसह संपूर्ण प्रकरणात आतापर्यंत अटक केलेल्या संशयितांची एकूण संख्या १२वर पोहचली आहे.

# पनवेलच्या सोसायटी मैदानात देवींचा जागर | झंकार नवरात्रोत्सवाला जबरदस्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने येथील एमसीसीएच मैदानात आयोजित करण्यात आलेल्या भव्य झंकार नवरात्रोसवाची अत्यंत उत्साहात सुरुवात झाली आहे. यंदाचे हे उत्सवाचे २१वे वर्ष असून तरुणाईसह नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना आणि पूजा भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव आणि त्यांच्या पत्नी पल्लवी झुंजारराव यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात झाली. यावेळी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी आदिशक्ती जगदंबेचे दर्शन घेऊन



अधिक छायाचित्रे पान ८ वर..

पनवेलकरांच्या सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली.

दरम्यान, झंकार नवरात्रोत्सवाचा पहिला दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. पहिल्याच दिवशी पनवेलकरांचा तुफान प्रतिसाद लाभल्याने संपूर्ण परिसर गरबा आणि दांडियाच्या ठेक्याने दुमदुमून गेला होता. नगरसेवक परेश ठाकूर यांनी येथे सदिच्छा भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला व उपस्थितांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनीदेखील गरब्याचा आनंद लुटत उपस्थितांचा उत्साह वाढवला. त्यांच्या समवेत नगरसेवक सुमित झुंजारराव तसेच उल्हास झुंझारराव, संजय जैन यांच्यासह अन्य मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते. दांडियामध्ये उत्कृष्ट नृत्य करणाऱ्या विजेत्या खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## पाण्याचा योग्य वापर करावा –आमदार प्रशांत ठाकूर

सध्या सर्वत्र नवरात्रोत्सवाचा उत्साह आणि गरब्याचा जल्लोष पाहायला मिळत आहे. त्यामुळे वातावरण भक्तिमय तसेच जोशपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दुष्काळाचे सावट असून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. त्यामुळे



पाण्याची नासाडी न करता त्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. पाणी हे जीवन आहे आणि लहानपणापासून आपण पाण्याचे महत्त्व ऐकत व शिकत आलो आहोत. त्यामुळे राज्यातील गंभीर परिस्थितीचे भान राखणे अत्यंत गरजेचे आहे. सण–उत्सव साजरे करताना त्याचा आनंद नक्की घ्यावा, परंतु त्याचे रूप हे उत्सवापुरते मर्यादित असावे. दुष्काळी परिस्थितीचे वास्तव लक्षात घेऊन पाणी वाचवण्याचा आणि त्याचा योग्य वापर करण्याचा संदेश आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला.

## पुण्यातील विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगा (एमपीएससी)मध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने व्ही. राधा समिती काम करीत आहेच. आता निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समिती चौकशी करेल. या चौकशी समितीचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे काम करतील, अशी घोषणा सरकारचे प्रतिनिधी म्हणून दाखल झालेले मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी रविवारी रात्री आंदोलनस्थळी केली. चौकशी होईपर्यंत एमपीएससी अध्यक्ष विवेक भिमनवार हे रजेवर असतील, असेही त्यांनी सांगितले. त्यानंतर पुण्यातील विद्यार्थ्यांनी आंदोलन तत्त्वतः स्थगित केले.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येणार आहेत तसेच विद्यार्थी, खासगी शिकवणी वर्गचालक आणि दूरध्वनी संदेशवाहक मंचांवरील वाहिन्यांच्या चालकांना बजावण्यात आलेल्या नोटीसही मागे घेण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## जंजिरा किल्ला उद्यापासून पर्यटकांसाठी होणार खुला



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण असलेला जंजिरा किल्ला १४ ऑक्टोबरपासून पुन्हा खुला होणार आहे. पुरातत्त्व विभागाने त्यास दुजोरा दिला आहे.

मुरूडजवळील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीत असलेला ऐतिहासिक जंजिरा किल्ला सुमारे २२ एकर क्षेत्रावर पसरलेला असून ४० फूट उंच तटबंदीने वेढलेला आहे. दरवर्षी लाखो पर्यटक या किल्ल्याला भेट देतात. पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून किल्ला बंद ठेवण्यात येतो, मात्र यंदा किल्ला पर्यटकांसाठी खुला होण्यास विलंब होत होता. पर्यटकांची गैरसोय आणि येथील लोकांची पर्यटनावर आधारित उपजीविका लक्षात घेऊन याबाबत स्थानिक पत्रकारांनी किल्ला अद्याप बंद असल्याची बाब खासदार सुनील तटकरे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर खासदार तटकरे यांनी पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत किल्ला सुरू करण्याचे निर्देश दिले. येत्या बुधवारी म्हणजेच १४ ऑक्टोबरला किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यात येईल, असे पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांनी सांगितले. त्यामुळे या किल्ल्यात पुन्हा एकदा पर्यटकांची गजबज पाहावयास मिळणार आहे.

## काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**पनवेल : कवी आणि कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे सदस्य अनिल दाभाडे यांच्या चांदणे फुलता या काव्यसंग्रहाचे प्रकाशन माजी खासदार, कोमसापचे सल्लागार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी कोमसाप नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, ज्येष्ठ कवी गणेश म्हात्रे, प्रा.डॉ.बी.जी. खाडे, संतोष जाधव, ज्योतिप्रसाद कुंभार, मधुसुदन पेरेकर, गौतम घेगडमल, मोहन तवटे आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दाभाडे यांच्या काव्य प्रतिभेचे कौतुक केले.**

## अवैध मद्य वाहतुकीवर कारवाई; एकाला अटक

■ १.३० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्कच्या कोकण विभागीय भरारी पथकाने ऐरोली रेल्वेस्थानकासमोरील बेलापूर–ठाणे मार्गावर परराज्यातील अवैध मद्याची वाहतूक करणारा ट्रक पकडला. या कारवाईत एक हजार बॉक्समधील ४८ हजार मद्याच्या बाटल्या आणि ट्रक असा एकूण एक कोटी ३० लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

बेलापूर–ठाणे मार्गावरून अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती विभागीय भरारी पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने ऐरोली रेल्वेस्थानकासमोर सापळा रचला. यावेळी बाराचाकी ट्रक (एमएच १० एडब्ल्यू ५२९४) अडविण्यात आला. वाहनचालकाने ट्रकमध्ये साबणाचे बॉक्स असल्याचे सांगितले, मात्र पथकाने वाहनाची तपासणी केली असता बॉक्समध्ये गोवा राज्यात निर्मित, महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेल्या रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या बाटल्या आढळून आल्या. या बाटल्यांवर बॅच क्रमांक व कमाल किरकोळ किंमत नमूद नसल्याचेही निदर्शनास आले. एकूण एक हजार बॉक्समधून ४८ हजार बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी जावेदखान नवाबखान पिंजारी (२४, रा. गधडदेव, ता.शिरपूर, जि.धुळे) याला अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# उपलब्ध शासकीय जमिनीचा मत्स्यव्यवसायासाठी परिणामकारक वापर करा -मंत्री नितेश राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणात खाऱ्या पाण्यातील आणि गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी स्वतंत्र मत्स्य बीज केंद्रे उभारण्याच्या प्रस्तावांना गती द्यावी. जलसंपदा महामंडळाच्या अखत्यारीतील जागेबाबत संबंधित स्तरावर पाठपुरावा करून सकारात्मक निर्णयानंतर महामंडळाच्या संचालक मंडळाचा ठराव सादर करावा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिले.



कोकणात मोठ्या क्षमतेचे मत्स्य बीज केंद्र आवश्यक असून त्यासाठी प्रस्तावित दोन हेक्टर क्षेत्र अपुरे असल्याचे मत्स्य विभागाने स्पष्ट केले. अशा केंद्रासाठी किमान पाच हेक्टर, तर शक्य असल्यास आठ ते दहा हेक्टर क्षेत्र आवश्यक आहे. खाडीलगत सुमारे ४० एकर शासकीय जमीन उपलब्ध असून तिचा खाऱ्या पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी उपयोग करता येऊ शकतो. रासायनिक घटकांचा संभाव्य परिणाम तपासण्यासाठी या जागेची तांत्रिक पाहणी करावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी कालव्यालगत जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील जागेचा प्रस्ताव पुढे आला आहे. महामंडळाच्या जमिनीच्या हस्तांतरणासाठी नियमानुसार ठराव आवश्यक असल्याने संबंधित प्रस्तावाचा पाठपुरावा करून तो संचालक मंडळासमोर ठेवावा. जमीन उपलब्ध झाल्यानंतर मत्स्य बीज केंद्राच्या कामाला सुरुवात करता येईल, असेही मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. वाशिष्ठी नदीतील गाळ काढण्याच्या पुढील टप्प्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. जलसंपदा विभागाने नदीपात्रात केलेल्या कामामुळे पूरस्थितीची तीव्रता कमी होण्यास मदत झाल्याचे आमदार शेखर निकम यांनी सांगितले. तसेच दाभोळ ते पेढे या राष्ट्रीय जलमार्ग क्रमांक २८ मधील नौवहन मार्ग मोकळा केल्यास प्रवासी वाहतूक तसेच मालवाहतुकीला चालना मिळेल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

महाराष्ट्र सागरी मंडळाने आपल्या निर्धारित हद्दीतील नौवहन मार्ग खुला ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. मात्र, पूरप्रतिबंधक उपाय म्हणून संपूर्ण गाळ काढण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन आणि जलसंपदा विभागाची आहे. वाळू उत्खननासाठी मिळालेली परवानगी आणि नदी अथवा खाडीतील गाळ काढण्याची परवानगी स्वतंत्र असून गाळ काढण्यासाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने स्वतंत्र सीआरझेड परवानगी घ्यावी. त्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्यास ते देण्याची भूमिका मंडळाने मांडली. यावेळी रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल दूरदृष्यप्रणालीद्वारे तर मत्स्य आयुक्त आणि जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र सागरी मंडळाचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

# 'पोलादपूर तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी पाण्याचा अपव्यय टाळा'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील रानबाजीरे पाण्याचा साठा नोव्हेंबरमध्ये ९८ टक्के असतो; यंदा सप्टेंबर महिन्यातच पाऊस थांबला तेव्हा पाण्याचा साठा ९८ टक्के होता. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी नजीकच्या काळामध्ये याचा अपव्यय टाळण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन राज्याचे रोजगार हमी योजना, खार जमीन विकास आणि फलोत्पादन मंत्री तथा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी केले.



पोलादपूर तालुक्यातील लोहारे गावांमधील धडाकेबाज मित्र मंडळाच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त नवरात्रौत्सवाचा शुभारंभ पालकमंत्री गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ना.गोगावले यांच्या समवेत रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण अर्थ व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, पं.स. सदस्य अनिल दळवी, उद्योगपती रामदास कळंबे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथशेठ उतेकर, युवासेना संपर्कप्रमुख विजय शेलार, उद्योजक अखलाकभाई पानसरे, माजी पं.स. उपसभापती संभाजी साळुंखे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री भरत गोगावले यांनी माजी पं.स. उपसभापती संभाजी साळुंखे यांच्याकडून पोलादपूर नगरपंचायतीच्या हद्दीतील सांडपाणी सावित्री नदीच्या पात्रातून लोहारे येथे येत असल्याची केलेली तक्रार योग्य असल्याचे सांगितले. नगरपंचायतीचा नाइलाज असला तरी नदीचे पाणी वाहात आहे. भविष्यात या समस्येवर उपाय निश्चितपणे करणार, अशी ग्वाही ना. गोगावले यांनी दिली.शुभारंभापूर्वी मनसे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष कामगार नेते राज पार्टे यांनी सदीच्छा भेट देऊन धडाकेबाज मित्र मंडळाचा ३०० वा वर्धापन दिन साजरा होवो अशी देवीचरणी प्रार्थना केली.

याप्रसंगी धडाकेबाज मित्र मंडळ लोहारेचे अध्यक्ष शरद साळुंखे, कार्याध्यक्ष प्रदीप नरे, उपाध्यक्ष निलेश साळुंखे, सचिव राकेश साळुंखे, खजिनदार दत्ताराम पवार तसेच धडाकेबाज मित्र मंडळ लोहारमाळ नवरात्र उत्सव समितीचे अध्यक्ष श्रीधर नरे,कार्याध्यक्ष सुयश साळुंखे, कार्याध्यक्ष भूषण देशमुख, उपाध्यक्ष नितीन पार्टे, सचिव साईराज पवार, खजिनदार संभाजी जाधव, सहसचिव यश चव्हाण, सहखजिनदार दिनेश दराडे, सल्लागार दीपक उतेकर, किरण देशमुख, सल्लागार जितेंद्र शिंदे आदींनी उपस्थित मान्यवरांचा स्वागत सत्कार केला.

याप्रसंगी आमची माती आमची माणसं संघटनेचे संस्थापक व मनसे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष राज पार्टे, अध्यक्ष अरुण मोहिते, फौजी नरेंद्र डिगे, मंडळाचे सदस्य व केंद्रप्रमुख म्हणून पदोन्नती प्राप्त प्राथमिक शिक्षक सुनील पवार, डॉ.राजेश शिंदे, २५ वर्षांनंतर दहावीची परिक्षा देऊन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या अंगणवाडी सेविका, सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थिनी, साईसेवक चव्हाण, शक्ती तुरा नाचाचे शक्तीवाली शाहीर वृदाली दळवी महाडिक, तुरेवाले शाहीर सुशांत जाधव आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी लोहारे येथील श्रीकृष्ण मित्र मंडळाच्या नवरात्रोत्सवाच्या देवीचे दर्शन मंत्री भरत गोगावले यांनी घेतले.

# कोतवाल बुद्रुक येथील विवाहितेच्या मृत्यूप्रकरणी पतीसह पाच जणांवर गुन्हा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांची सुन गार्गी गणेश दरेकर हिचा गळफास लावून मृत्यू झाल्याप्रकरणी तिला आत्महत्या करण्यात प्रवृत्त केल्याचा पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी तिचा पती गणेश दरेकर यांच्यासह अन्य चार जणांवर गुन्हा दाखल करुन पतीला अटक करुन महाड न्यायालयात हजर केले असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

कोतवाल बुद्रुक येथील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांच्या घरी मुलगा घराबाहेर गेला असताना सुनबाई गार्गी दरेकर (वय २३) हिने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून गळफास लावून घेतल्याने तिचा मृत्यू झाला असल्याचे दिसून आले. यावेळी मृत विवाहित महिलेचा भाऊ प्रथमेश दळवी (वय २८) याने बहिणीचा मृतदेह पाहून पोलादपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

यानंतर ताराराणी ब्रिगेडच्या अध्यक्षा वंदनाताई मोरे यांना भेटून मृत विवाहितेच्या नातेवाईकांनी कैफियत सांगितली आणि निवेदन दिले. वंदनाताई मोरे यांनी ताराराणी ब्रिगेडच्या उपाध्यक्षा कविता खोपकर यांनी महाड उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे यांची भेट घेतली आणि चर्चा केली. यानंतर पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांना नातेवाईकांनी दिलेले निवेदन सादर केले.

या बाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या फिर्यादीनुसार पोलादपूर पोलिसांनी सदर गुन्ह्यातील आरोपी गणेश मुरलीधर दरेकर यांस दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अटक केली आहे.

# स्व. लक्ष्मी ठाकूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वृक्षारोपण

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील स्व.लक्ष्मीबाई दामोदर ठाकूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सोमवारी त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने सिडको मार्गावर वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांच्या ९४ वर्षाच्या समृद्धी जीवनाचा सन्मान करण्यासाठी सन्मान सभा ही घेण्यात आली. यावेळी उरण पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष हेमलता पाटील,सामाजिक कार्यकर्ते जनार्दन ठाकूर,यशवंत ठाकूर,संतोष ठाकूर,बोकडविरा ग्रामपंचायत सदस्य गीता पाटील,पराग ठाकूर आदीजन उपस्थित होते.

लक्ष्मीबाई ठाकूर यांनी बोकडविरा ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य म्हणून त्यांनी काम केले डाव्या चळवळीत कामगार शेतकरी आणि महिलांना न्याय मिळावा यासाठी झालेल्या प्रत्येक लढयात त्यांनी आपला सहभाग नोंदविला. १९८४च्या शेतकरी आंदोलनातील हुतात्म्यांना मुंबईत नेल्यानंतर भाई बंदरकर आणि इतर जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली दामोदर ठाकूर यांनी सहकार्य केले.

# अखंडित व योग्य दाबाने वीजपुरवठा करा -पालकमंत्री भरत गोगावले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील नागरिकांना अखंडितपणे, योग्य दाबाने आणि विनाअडथळा वीजपुरवठा होण्यासाठी विद्युत वितरणाची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन रोहित्रांची क्षमता वाढवावी, आवश्यकतेनुसार नवीन विद्युत उपकेंद्रे प्रस्तावित करावीत आणि दुर्गम तसेच डोंगराळ भागातील नागरिकांनाही नियमित वीजपुरवठा होईल, याची दक्षता घ्यावी. विद्युत वितरणाबाबत नागरिकांच्या तक्रारी उद्भवणार नाहीत, यासाठी यंत्रणेने तत्परतेने काम करावे, असे निर्देश फलोत्पादन मंत्री तथा पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात विद्युत वितरण कंपनीच्या कामकाजाचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक ऑचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक उपस्थित होते.

वाढत्या वीजवापरामुळे विजेची मागणी वाढली असून, अनेक ठिकाणी रोहित्रांवरील अतिरिक्त भारामुळे नागरिकांना कमी दाबाने वीजपुरवठा होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार रोहित्रांची संख्या आणि क्षमता वाढवावी, जुनी व अकार्यक्षम रोहित्रे बदलावीत आणि जिल्ह्यात नवीन विद्युत उपकेंद्रांची आवश्यकता तपासून प्रस्ताव सादर करावेत. उद्योगांना वीजपुरवठा करतानाच स्थानिक नागरिकांच्या गरजांकडेही तितकेच लक्ष द्यावे. दुर्गम भागातील नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, असे पालकमंत्री म्हणाले.

स्मार्ट मीटरमुळे वीजदेयके अधिक येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारींची गांभीर्याने शहानिशा करून वस्तुस्थिती तपासावी आणि योग्य कार्यवाहीद्वारे त्यांचे तातडीने निराकरण करावे. रस्त्यालगत असलेल्या रोहित्रांमुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्वेक्षण करावे आणि आवश्यकतेनुसार रोहित्रे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावीत. पडलेले विद्युत खांब, जीर्ण झालेल्या तारा आणि धोकादायक विद्युत यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करून संभाव्य अपघात टाळावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

शासनाच्या विद्युत वितरणविषयक विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा. 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना, भूमिगत विद्युत वाहिन्या आणि इतर योजनांच्या अंमलबजावणीला गती द्यावी. जिल्ह्यातील १०० आदिवासी वाड्या सौरऊर्जेच्या माध्यमातून सुसज्ज करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे. तसेच, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून सौरऊर्जेचा वापर वाढविण्यावर भर द्यावा. नवीन सविस्तर प्रकल्प अहवालांच्या (डीपीआर) अनुषंगाने प्रस्तावित कामांचा आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याच्या योजनांना आवश्यकतेनुसार विद्युत जोडणी आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा. विशेषतः डोंगराळ भागातील संभाव्य टंचाईग्रस्त गावांपर्यंत पाणी पोहोचविणाऱ्या योजनांना प्राधान्य द्यावे.

पाणीपुरवठा योजनांमध्ये विजेअभावी अडथळे निर्माण होणार नाहीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. जिल्ह्यातील विद्युत वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून नागरिकांना योग्य दाबाने आणि विनाअडथळा वीजपुरवठा मिळेल, याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, असे पालकमंत्री भरत गोगावले यांनी स्पष्ट केले.

# कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अंतर्गत समिती स्थापन करणे आणि माहिती फलक बंधनकारक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील/क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, खाजगी कंपन्या, कारखाने, दुकाने, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, बँका, आणि सहकारी संस्था (जिथे १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी) कार्यरत आहेत अशा प्रत्येक ठिकाण, शाखा, यांच्या व्यवस्थापनांनी कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारच्या कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ मधील कलम ४ अन्वये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे कायद्याने बंधनकारक आहे. तसेच शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्था, कंपन्या आणि आस्थापनांमध्ये अंतर्गत समिती गठीत करणे आणि कार्यालयाच्या दर्शनी भागात समितीचा माहिती फलक लावणे बंधनकारक आहे अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी दिली आहे.

स्थानिक जिल्हा समिती ज्या आस्थापनांमध्ये १०पेक्षा कमी कर्मचारी आहेत, अशांनी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत असणाऱ्या स्थानिक समितीचा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहे.या कायद्याचे उल्लंघन केल्यास, कायद्याचे कलम २६ (८) नुसार, अंतर्गत समिती स्थापन न केल्यास, वार्षिक अहवाल सादर न केल्यास, संबंधित नियोयाला/संस्थेला रु.५००००/- पर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास दंड दुप्पट केला जाऊ शकतो आणि संस्थेचा परवाना किंवा व्यवसाय नोंदणी रद्द केली जाऊ शकते.

संबंधितांनी त्वरित अंतर्गत तक्रार समिती गठीत करून त्याचा फलक कार्यस्थळावर लावावा आणि तसा अहवाल अद्यावत करावा.

**पान १ वरुन**

## रायगडातील पाच समुद्र किनाऱ्यांवर रोबोटिक बोयाचे सुरक्षा कवच!



या उपकरणांच्या मदतीने दहाहून अधिक पर्यटकांचे प्राण वाचवण्यात यश आल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे समुद्र किनाऱ्यांवरील बचावकार्यात रोबोटिक बोयांची उपयुक्तता लक्षात घेऊन कोकणातील किनाऱ्यांसाठी ही सुविधा वाढविण्यात येत आहे.

दरम्यान, रोबोटिक बोयांसोबतच समुद्र किनाऱ्यांवर गृहरक्षक दलाचे जवानही तैनात केले जाणार आहेत. रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर १७५ जवानांची नियुक्ती करण्यात येणार असून बुडणाऱ्या पर्यटकांचे प्राण वाचविण्यासाठी त्यांना आवश्यक प्रशिक्षण दिले जाणार आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी उपकरणांसह प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती पालकमंत्री गोगावले यांनी दिली.

# बँक ऑफ इंडिया अकॅडमी फॉर प्रोफेशनल एक्सलेन्स हिंदी महिन्याचा समारोप



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया, अकादेमी फॉर प्रोफेशनल एक्सलेन्स , नवी मुंबई येथे ०१ ते २९.सप्टेंबर २६ हिंदी महिना साजरा करण्यात आला. या कालावधीत कार्यालयात कर्मचार्यांनी दैनिक कामकाजामध्ये हिंदी भाषेचा वापर केला दिनांक १४ रोजी "हिन्दी दिवस" साजरा करण्यात आला .

हिंदी महीना समाप्ती प्राचार्य मनीषकर राय अणि उप प्राचार्य सत्य प्रकाश व समस्त कर्मचार्यांच्या उपस्थितीत करण्यात आली.या प्रसंगी कार्यालयीन कामकाजात जास्तीत जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची विनंति प्राचार्य मनीष कर राय व्यक्त केली. त्यांनी आपल्या भाषणामध्ये आवाहन केले की, आपल्या कार्यालयात जास्तीय जास्त काम हिंदीत केले जावे .सतत हिंदी भाषेचया वापर करण्यात यावा. हिंदी भाषेचा वापर करून सर्वांनी राष्ट्र निर्माण मध्ये सहभागी व्हावे.

हिंदी महिन्या मध्ये हिन्दी वर्ग पहेली, हिंदी मुहावरे ,बैंकिंग शब्दावली स्पर्धा घेण्यात आल्या प्राचार्य एवं उप महाप्रबंधक मनीष कर राय आणि उप प्राचार्य सत्यप्रकाश यानी हिंदी स्पर्धेच्याविजेत्यानां पुरस्कार आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले .त्यानंतर हिंदी महिन्याची सांगता करण्यात आली .

## दुखवटा

### कमलादेवी चौधरी



**माणगाव :** येथील प्रसिद्ध व्यावसायिक तथा हॉटेल संगम रेस्टॉरंटचे मालक उदयराज चौधरी यांच्या मोतोश्री कै.कमलादेवी शिवचरण चौधरी यांचे अल्पशा आजाराने रविवार दि.११ ऑक्टोबर रोजी रात्री ९ :३० वाजता त्यांच्या राहते घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले,एक मुलगी,सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार दि.२० ऑक्टोबर रोजी तर उत्तरकार्य विधी शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६ रोजी राहते घरी कचेरी रोड,शिवाजीनगर,आपला बाजार समोर ता.माणगाव येथे होणार आहे.

### सुनीता मोरे



**अलिबाग :** सुनीता दामोदर मोरे (वय ८६) यांचे सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. भंडारी समाजाचे कार्यकर्ते संतोष मोरे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवारी २१ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता अलिबाग येथे होणार असून, शुक्रवारी २३ रोजी बाराव्याचा विधी होणार आहे.

### सदाशिव पवार



**पनवेल :** महाराष्ट्र राज्य पोलीस दलाची ३६ वर्षे धुरा सांभाळून सेवानिवृत्त झालेले ह. भ. प सदाशिव रामजी पवार यांचे रविवारी (दि.११) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२०) तर उत्तर कार्य गुरुवारी (दि.२२) धरणा कॅम्प, पनवेल येथे होणार असल्याचे त्यांची मुले सचिन व राकेश पवार यांनी सांगितले आहे.

# पनवेलमध्ये नवरात्रोत्सवाची धूम

## जाखमाता मंदिरात भाविक नतमस्तक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवानिमित्त ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या माळा आणि विद्युत रोषणाईच्या झगमगाटात सध्या पनवेल परिसर देवीमय झाला आहे. पनवेलची ग्रामदेवता जागृत जाखमाता देवीच्या मंदिरासह शहरातील प्रत्येक गल्ली, चौक आणि सार्वजनिक मंडळांमध्ये शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा होत असून नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवाने संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.




नवसाला पावणारी आणि रोगराईपासून रक्षण करणारी जागृत देवता म्हणून ओळख असलेल्या जाखमाता देवीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची रांग लागत आहे. पनवेल परिसरासह नवी मुंबई, उरण, पेण, कर्जत आणि पंचक्रोशीतील भाविक ओटी भरण्यासाठी आणि नवस फेडण्यासाठी मोठ्या संख्येने येत आहेत. पनवेलची जागृत माता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देवीचे मूळ नाव जाखमाता असल्याची नोंद इतिहासात सापडते. सन १९४२ ते ४७ या कालावधीत पनवेल गावात प्लेगच्या साथीने थैमान घातले होते. त्यावेळी अनेकांनी गाव सोडले, मात्र जाखमाता देवीवर अपार श्रद्धा असलेले भक्त मंदिर परिसरातच देवीच्या कृपाछत्राखाली राहिले आणि त्यांच्यावर प्लेगचा कोणताही परिणाम झाला नाही.

या दृष्टांतापासूनच जाखमाता देवीचे महात्म्य परिसरात पसरले. मंदिरात चैत्रातील पालखी सोहळा व आश्विन महिन्यातील नवरात्रोत्सव हे दोन उत्सव मोठ्या श्रद्धेने साजरे केले जातात. गेल्या नऊ ते दहा दशकांपासून पालखी सोहळा रात्री ९ वाजल्यापासून सुरू होऊन संपूर्ण पनवेलमधून फिरत पहाटेपर्यंत मंदिरात येतो. साडी-चोळी नेसवणे, ओटी भरणे, पाळण्याचा नवस, तर बाळाच्या व्यंग बरे होण्यासाठी चांदी, तांबे किंवा लाकडी अवयवांच्या प्रतिकृती अर्पण करणे असे विविध नवस येथे फेडले जातात.

गावात जन्मलेले बाळ देवीच्या पायावर ठेवल्याशिवाय गावाबाहेर नेत नाहीत. नवविवाहित दाम्पत्य प्रथम देवीच्या दर्शनाला येण्याची परंपरा आजही कायम आहे. यंदा पनवेल परिसरातील सार्वजनिक मंडळांनी सामाजिक संदेश देणारे देखावे, गरबा, दांडिया व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विशेष सुरक्षा व्यवस्था ठेवली असून मंदिर परिसर फुलांनी सजविण्यात आला आहे.

### कळंबोलीतील तुळजाभवानी मंदिरात भक्तिमय जागर

कळंबोली येथील एलआयजी-२, सेक्टर २ मधील जय तुळजाभवानी माता मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा होत आहे. धार्मिक विधी, भजन-कीर्तन, महायज्ञ आणि विविध सामाजिक उपक्रमांमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. आता मंदिरात शतचंडी महायज्ञाला प्रारंभ झाला असून नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जय तुळजाभवानी माता सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित या नवरात्रोत्सवात देवीमूर्ती अभिषेक, घटस्थापना, शतचंडी महायज्ञ, लक्ष्मी विधान, कुंकुमार्चन, सरस्वती विधान, आरती आणि भजन असे कार्यक्रम होणार आहेत. तसेच स्थानिक आदिवासी मुलांसाठी चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी मंदिरात नवचंडी महापूजा व सप्तशती पाठ, तर दसऱ्यानंतर देवीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# बाप्पासमोरचे धान्य शांतीवनातील वृद्धाश्रमाला

## पनवेलमध्ये स्तुत्य उपक्रम

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणपती बाप्पासमोर जमा झालेले धान्य पनवेल तालुक्यातील शांतीवनातील वृद्धाश्रम, आधारघर आणि भोजनालयातील रुग्णांना भेट देण्यात आले. कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनच्या कोषाध्यक्ष रेखा विनायक देखणे यांच्या घरच्या गणपतीला शंभर सव्वाशे वर्षांची परंपरा आहे. साधारणपणे २०० ते २५० गणेशभक्त त्यांच्या घरी दर्शनासाठी येत असतात.



देवाला भक्तिभावे पेढे, फळे अर्पण करत असतात पण त्यानंतर या प्रसादाचे काय करावे, असा प्रश्न त्यांना पडत असे. २०२२ पासून त्यांची मुलगी राजलक्ष्मी आणि जावई पराग पेजावर यांनी एका अनोख्या उपक्रमाची सुरुवात केली. गणपती उत्सवाचे निमंत्रण देतानाच येणाऱ्या निमंत्रितांना प्रसादाऐवजी धान्य म्हणजेच तांदूळ, डाळी, साखर इत्यादी देवासमोर ठेवण्यास सुचवले. म्हणजे त्या वस्तू समाजोपयोगी संस्थांना देता येतील, अशी कल्पना त्यांनी मांडली. या कल्पनेला गणेशभक्तांनी मोठा प्रतिसाद दिला. दरवर्षी २०० किलोपेक्षा जास्त धान्य जमा होत आहे. पहिल्या वर्षी त्यांनी खडवली येथील वृद्धाश्रमात हे धान्य दिले. त्यानंतर आता दरवर्षी कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनच्या विविध विभागात हे धान्य जमा करण्यात येते.

गणेशभक्तांकडून दरवर्षी जेवढे धान्य जमा होते तेवढेच धान्य अथवा पैसे त्यांची मुलगी व जावई देणगी देतात. यावर्षी १९ प्रकारचे ५०० किलो धान्य संस्थेच्या वृद्धाश्रम, आधारघर, कार्यकर्ता भोजनालय, रुग्ण भोजनालय अशा विविध विभागांना देण्यासाठी संस्थेचे प्रमुख कार्यवाह अजय शिर्के व रुग्ण भोजनालय व्यवस्थापक प्रिया बाळाराम रोडपालकर तसेच बाळाराम गणू रोडपालकर, बाबूराव महाजन यांच्याकडे सुपूर्द केले. अत्यंत स्तुत्यपणे हा उपक्रम राबवला जात आहे. पारंपरिक पद्धतीने गणेश उत्सवही होतो व समाजसेवादेखील घडते याचे समाधान रेखा देखणे यांनी व्यक्त केले. कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर यांनी उपक्रमाबद्दल देखणे यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# पनवेलमध्ये इन्फिनिटी फाउंडेशनच्या विशेष लोगोचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशनची स्थापना १७ ऑक्टोबर २०१५ रोजी करण्यात आली असून १७ ऑक्टोबर २०२६ रोजी संस्थेची ११ वर्षांची सामाजिक वाटचाल पूर्ण होत आहे. ११व्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या विशेष लोगोचे अनावरण पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ आकुला, सरचिटणीस यश दुबे, प्रणय उसाटकर तसेच फाउंडेशनचे इतर सदस्य उपस्थित होते.




११व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून इन्फिनिटी फाउंडेशनच्या माध्यमातून ११ विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचून सामाजिक बांधिलकी जपणे आणि सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांमध्ये मुलांच्या सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी गुड टच-बॅड टच परिसंवाद, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्यक्रम, जॉय कॅम्प आणि मोरबे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत आरोग्य शिबिर यांचा समावेश आहे. तसेच ईशा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने मोफत योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. नवरात्रोत्सवानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नऊ महिलांचा सन्मान करण्यात येणार असून रील स्पर्धा आणि छायाचित्रण स्पर्धेच्या माध्यमातून कला व सर्जनशीलतेला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

तृतीयपंथीयांसाठी साडी वितरण व सन्मान कार्यक्रम, रायगड जिल्हा परिषद शाळा, फणसवाडी येथे नृत्य कार्यशाळा, स्वसंरक्षण कार्यशाळा आणि 'बुक महफिल' उपक्रमांचेही आयोजन करण्यात येणार आहे. इन्फिनिटीचे अध्यक्ष आयुफ आकुला म्हणाले, इन्फिनिटीची ११ वर्षांची वाटचाल समाजातील विविध घटकांच्या सहकार्याने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साकार झाली आहे. अकराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात येणारे सामाजिक उपक्रम केवळ उत्सवापुरते मर्यादित नसून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. महिला सक्षमीकरण, बालसुरक्षा, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक समावेशकता या क्षेत्रांत अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा आमचा संकल्प आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचून त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी इन्फिनिटी फाउंडेशन यापुढेही कटिबद्ध राहील.

सरचिटणीस यश दुबे म्हणाले की, ११ वर्षांच्या सामाजिक वाटचालीत सदस्य, स्वयंसेवक आणि हितचिंतकांचे मोलाचे योगदान लाभले.

# गव्हाणच्या बंद खाणीत पडून एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

उरण तालुक्यातील गव्हाण येथे बंद खाणीजवळ एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळल्याची घटना नोव्हेंबर २०२४मध्ये घडली होती. या मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसल्याने उरण पोलिसांनी तिच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ज्ञानेश्वर इस्टेट कंटेनर यार्डच्या मागील बाजूस असलेल्या दांडाच्या बंद खाणीजवळ ही घटना घडली. सुमारे ६० ते ७० फूट उंच डोंगराच्या कड्यावरून खाली पडल्याने संबंधित व्यक्ती गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. जखमी अवस्थेत त्याला उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृत व्यक्तीचे वय २५ ते ३५ वर्षे, उंची १५७ सेंटीमीटर, शरीरयष्टी सडपातळ आणि रंग सावळा आहे.

मृत व्यक्तीने फिकट पिवळ्या रंगाचा पूर्ण बाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची अंतर्वस्त्रे परिधान केली होती. तसेच गळ्यात काळ्या रंगाच्या धाग्यात काळ्या रंगाचे लॉकेट होते. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात अपमृत्यू नोंद क्रमांक ९४/२०२४ अन्वये नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. या वर्णनाच्या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास उरण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना नुकतेच प्रतिष्ठित शरदरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. यानिमित्त कामगार नेते तथा भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, माजी प्राचार्य अरुण घाग, नूरा शेख, डी.पी. सोनावणे, सागर रंधवे आदींनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले.**

# साई नारायणबाबा ट्रस्टकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

साई नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांत पहिली ते आठवीत शिक्षण घेणाऱ्या सुमारे ६०० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. पनवेल येथील साई मंदिरात आयोजित कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, भाजप नेते रविशेठ पाटील, सभापती अजय बहिरा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. साई नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी आणि कार्यवाह सेक्रेटरी राम थदानी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळेल. सामाजिक बांधिलकी जपत साई नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून वर्षभर शैक्षणिक, आरोग्यविषयक, धार्मिक तसेच आर्थिक साह्याचे विविध उपक्रम राबविले जातात.

# डीडीएसआर ग्रुपच्या राहुल हजारे यांना रिअल इस्टेट क्षेत्रातील प्रतिष्ठित पुरस्कार



**पनवेल : वार्ताहर**

रिअल इस्टेट क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या डीडीएसआर ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक राहुल हजारे यांनी मानाचे दोन पुरस्कार पटकावले आहेत. क्रेडाई बानम रायगड आणि मिड-डे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रिअल इस्टेट एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ या पुरस्कार सोहळ्यात त्यांना यंग आंत्रप्रेन्योर ऑफ द इयर आणि एक्सलन्स इन टेंडर प्लॉट्स थ्रू को-ऑपरेटिव्ह सोसायटी या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते राहुल हजारे यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. नवी मुंबई आणि रायगड परिसरातील बांधकाम व रिअल इस्टेट क्षेत्रात डीडीएसआर ग्रुपने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिस्तबद्ध कार्यपद्धती, पारदर्शक व्यवहार, आधुनिक दृष्टिकोन आणि ग्राहकांच्या विश्वासाला दिलेले प्राधान्य या बाबींच्या जोरावर राहुल हजारे यांनी उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय स्थान मिळवले आहे. त्यांच्या उद्योजकीय वाटचालीची दखल घेत यंग आंत्रप्रेन्योर ऑफ द इयर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सहकारी संस्थांच्या माध्यमातून टेंडर प्लॉट्स क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डीडीएसआर ग्रुपला एक्सलन्स इन टेंडर प्लॉट्स थ्रू को-ऑपरेटिव्ह सोसायटी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे रिअल इस्टेट क्षेत्रातील ग्रुपच्या कार्याची आणि व्यावसायिक दृष्टिकोनाची दखल घेतली गेली आहे.

# नवीन पनवेलमधील जुन्या विहिरींची स्वच्छता आणि दुरुस्ती करा!

## नगरसेविका अ‍ॅड. शिवानी घरत यांची महापौर नितीन पाटील यांच्याकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल परिसरातील अस्तित्वात असलेल्या जुन्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांची स्वच्छता, गाळ काढणे आणि आवश्यक दुरुस्ती करून त्या पुनर्वापरात आणाव्यात, अशी मागणी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १७ मधील नगरसेविका अ‍ॅड. शिवानी सुनील घरत यांनी महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलस्रोतांचा योग्य पद्धतीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. नवीन पनवेल परिसरातील काही भागांत सध्या पाणीटंचाईची समस्या जाणवत असून दुसरीकडे परिसरातील अनेक जुन्या विहिरी जीर्ण अवस्थेत असल्याने त्यांचा वापर होत नाही. या विहिरींची योग्य देखभाल व दुरुस्ती केल्यास त्या पुन्हा वापरात आणणे शक्य होणार आहे.

या विहिरींची पाहणी करून त्यांची स्वच्छता करणे, त्यातील गाळ काढणे, आवश्यक दुरुस्ती करणे तसेच विहिरींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षक उपाययोजना करणे गरजेचे आहे. या माध्यमातून उपलब्ध पाणीसाठ्याचा उपयोग वाढण्यास मदत होईल. तसेच पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पर्यायी जलस्रोत उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे नवीन पनवेल परिसरातील सर्व अस्तित्वात असलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांच्या स्वच्छतेसह आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत आणि त्या पुनर्वापरात आणण्यासाठी संबंधित विभागाला तातडीने सूचना द्याव्यात, अशी विनंती अ‍ॅड. शिवानी सुनील घरत यांनी महापौर नितीन पाटील यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

कर्करोगग्रस्त रुग्णांना मदत करण्याच्या उद्देशाने पनवेल येथील पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिरात संयुक्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली. प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेल, पूज्य सिंधी पंचायत, पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच, पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघ, विश्व सिंधी सेवा संगम आणि टाटा मेमोरियल सेंटर खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन नियमित रक्तदाते सचिन कापसे व त्यांच्या पत्नी तसेच चित्रकार भूषण चोणकर यांच्या हस्ते करण्यात आले. कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची गरज लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिर यशस्वी करण्यासाठी मनोहर सचदेव, अमोल साखरे, पांडुरंग हुमणे, किसन रौंदळ, मुरलीधर ढाके, संगीता साखरे, उज्ज्वला व सचिन भिसे, प्रभाकर म्हात्रे, बन्सीलाल तळेकर, राजेश भगत यांच्यासह सर्व संबंधित संस्थांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.



## संपादकीय

# अराजकतेचा घाट

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करणे हा विरोधकांचा अधिकार असला, तरी त्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी घटनात्मक संस्थांवर दबाव आणणे कितपत योग्य आहे? न्यायालयीन प्रक्रियेतून दाद मागण्याचा मार्ग उपलब्ध असताना राजकीय नेत्यांनी आंदोलनाचा दबाव निर्माण करण्याची गरजच काय?

**काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविषयीच्या तक्रारी मांडण्यासाठी सरन्यायाधीश सूर्यकांत यांची भेट मागितली होती. मात्र, सरन्यायाधीशांनी रविवारी त्यांची ही विनंती फेटाळून लावली. संबंधित विषय न्यायप्रविष्ट असल्याने अशा बैठकीमुळे सत्ताविभाजनाच्या घटनात्मक तत्त्वाला बाधा येऊ शकते अशी भूमिका त्यांनी घेतली. तक्रार असल्यास न्यायालयात याचिका दाखल करण्याचा मार्ग खुला असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सरन्यायाधीशांनी भेट नाकारली म्हणजे न्याय मिळण्याचे दरवाजे बंद झाले असा त्याचा अर्थ होत नाही. तरीही राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने मोर्चा काढला. या आंदोलनाचे वर्णन करताना राहुल गांधी यांनी 'शिव तांडव' आणि 'शिवजी की बारात' अशी भाषा वापरली. राजकीय आंदोलनाला भगवान शंकर यांच्या तांडवाची उपमा देणे कितपत उचित आहे? स्वाभाविकच भारतीय जनता पक्षाने या विधानावर जोरदार टीका केली. राहुल गांधी यांच्या राजकीय शैलीला 'सडकछाप' संबोधत भाजपने त्यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेतला. आंदोलनाच्या नावाखाली धार्मिक प्रतीकांचा वापर आणि घटनात्मक संस्थांभोवती संघर्षाचे वातावरण निर्माण करणे यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचे होतात. काँग्रेस आणि इंडी आघाडीच्या या आंदोलनाने विरोधी पक्षांच्या राजकारणाची दिशा पुन्हा एकदा देशासमोर आणली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत नेमकी टीका केली आहे. संविधानाचा आधार घेत संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांना निष्प्रभ करण्याचे काम काँग्रेस करत आहे. देशात अराजकता निर्माण करण्याचे हे नवे धोरण आहे असे फडणवीस यांनी म्हटले असून त्यांच्या या विधानातून विरोधकांच्या राजकारणातील मूलभूत विसंगती अधोरेखित होते. देशात अराजकता पसरवून कडव्या डाव्या विचारांची व्यवस्था प्रस्थापित करण्याची जणु स्पर्धाच काँग्रेस आणि कॉक्रोच जनता पार्टी यांच्यात सुरू आहे असेही त्यांनी यापूर्वी म्हटले आहे. खरेच लोकशाही म्हणजे केवळ आंदोलनाचा अधिकार नव्हे तर घटनात्मक मर्यादांचे पालन करण्याची जबाबदारीही होय. संविधानाच्या रक्षणाच्या नावाखाली संवैधानिक संस्थांवर दबाव निर्माण करणे आणि जनतेच्या मनात त्यांच्याविषयी अविश्वास पसरवणे, हा लोकशाहीचा विजय ठरू शकत नाही. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांविषयी सातत्याने अविश्वास निर्माण केल्यास लोकशाहीचा पायाच कमकुवत होण्याचा धोका आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत शंका असतील तर त्यांची तथ्यांच्या आधारे चौकशी व्हावी. विरोधकांनी पुरावे मांडावेत, न्यायालयात याचिका दाखल करावी आणि जनतेसमोर आपली बाजू मांडावी. मात्र प्रत्येक संस्थेचा निर्णय आपल्या राजकीय भूमिकेला अनुकूल नसेल, तर त्या संस्थेविरोधात रस्त्यावर उतरायचे, हा पायंडा लोकशाहीसाठी निश्चितच घातक आहे. विरोधकांनी आज विविध आंदोलनांच्या माध्यमातून देशात अराजकता माजवण्याचा प्रयत्न चालवला आहे. सीजेपीच्या जंतरमंतरवरील पहिल्या आंदोलनात काय काय झाले ते अवघ्या देशाने पाहिले आहे. राहुल गांधी आणि इंडी आघाडीने आता तरी आत्मपरीक्षण केले पाहिजे. अन्यथा लोकशाहीच्या संरक्षणाचा मुखवटा धारण करून देशात अराजकता निर्माण करण्याचे प्रयत्न म्हणूनच इतिहास या आंदोलनाकडे पाहील.**

# ज्येष्ठ नागरिकांचा आदर : अनुभवाचा खजिना



ज्येष्ठ नागरिक म्हणजे आपल्या समाजाचा अमूल्य ठेवा आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कुटुंबासाठी आणि समाजासाठी घालवले आहे. त्यांच्या कष्टातूनच आजची पिढी सुखी जीवन जगत आहे. त्यांच्या अनुभवातून आपल्याला जीवनातील अनेक धडे मिळतात. ज्येष्ठ नागरिकांचा आदर करणे हे केवळ कर्तव्य नसून ती आपली संस्कृती आहे. घरातील आजी–आजोबा हे ज्ञानाचे भांडार असतात. त्यांनी अनेक चढ–उतार पाहिलेले असतात. त्यांच्या गोष्टींमधून इतिहास जिवंत होतो. ते आपल्याला जुन्या परंपरा, सण आणि संस्कृती यांची माहिती देतात. त्यांच्या सहवासात लहान मुलांवर चांगले संस्कार होतात. आजीच्या गोष्टींमधून मुलांना नीतिमूल्ये शिकायला मिळतात. आजोबांच्या मार्गदर्शनातून युवकांना योग्य दिशा मिळते.

ज्येष्ठ नागरिकांचा अनुभव हा कोणत्याही पुस्तकापेक्षा मोठा असतो. त्यांनी जीवनात अनेक संकटांचा सामना केलेला असतो. त्या अनुभवातून ते आपल्याला मार्गदर्शन करतात. एखाद्या समस्येवर त्यांचा दृष्टिकोन वेगळा आणि समजूतदारपणाचा असतो. त्यांच्या सल्ल्यामुळे अनेक कुटुंबे वाद टाळू शकतात. व्यवसायात त्यांचा अनुभव उपयुक्त ठरतो. शेतीत त्यांचे ज्ञान मोलाचे असते. आज अनेक ज्येष्ठ नागरिक एकटेपणाने त्रस्त असतात. मुले नोकरीसाठी बाहेरगावी गेलेली असतात. अशा वेळी त्यांना आपुलकीची गरज असते. त्यांच्याशी नियमितपणे संवाद साधावा. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करावी. त्यांना वेळ द्यावा. त्यांच्या आवडी–निवडी जपाव्यात. छोट्या गोष्टींमधूनही त्यांना आनंद मिळतो. त्यांच्यासोबत जेवण करणे, त्यांना फिरायला नेणे आणि त्यांच्या आठवणी ऐकणे यांमधून त्यांना समाधान मिळते. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. वाढत्या वयात अनेक आरोग्य समस्या उद्‌भवतात. नियमित तपासणी करावी. सकस आहार द्यावा. औषधे वेळेवर द्यावीत. योग आणि हलका व्यायाम यांसाठी प्रोत्साहन द्यावे. त्यांच्या झोपेची आणि विश्रांतीची काळजी घ्यावी. घरात त्यांना सुरक्षित वातावरण द्यावे. पायऱ्यांवर आधार, स्वच्छतागृहात पकडण्यासाठी रॉड यांसारख्या सुविधा कराव्यात. त्यांच्या छोट्या गरजांकडे लक्ष द्यावे.

समाजात ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेक उपक्रम राबवता येतात. ज्येष्ठ नागरिक संघ स्थापन करावेत. तेथे त्यांनी एकत्र येऊन गप्पा माराव्यात. भजन, कीर्तन आणि वाचन यांसारखे कार्यक्रम आयोजित करावेत. त्यांच्या कलागुणांना वाव द्यावा. अनेक ज्येष्ठ नागरिकांना लेखन, चित्रकला आणि संगीत यांची आवड असते. त्यांना त्यांचे छंद जोपासण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. त्यांच्या अनुभवाचा लाभ शाळांमधून विद्यार्थ्यांना द्यावा. तंत्रज्ञानाच्या युगात ज्येष्ठ नागरिकांना मागे ठेवू नये. त्यांना मोबाईल आणि इंटरनेटचा वापर शिकवावा. व्हिडिओ कॉलद्वारे ते दूर असलेल्या मुलांशी बोलू शकतात. ऑनलाईन व्यवहार शिकल्याने त्यांचे जीवन सोपे होते. अनेक ज्येष्ठ नागरिक तंत्रज्ञान शिकण्यास उत्सुक असतात. त्यांना संयमाने शिकवावे. त्यांच्या शिकण्याच्या प्रयत्नांचे कौतुक करावे. ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे ही आपली परंपरा आहे. सणासुदीला त्यांना मान द्यावा. त्यांचे आशीर्वाद घ्यावेत. त्यांच्या वाढदिवसाला त्यांना शुभेच्छा द्याव्यात. त्यांच्या कार्याचा गौरव करावा. गावांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ आयोजित करावा. त्यांच्या जीवनगाथा इतरांना सांगाव्यात. त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवावी.

तरुण पिढीने ज्येष्ठ नागरिकांकडून शिकावे. त्यांच्या संयमातून, शिस्तीतून आणि प्रामाणिकपणातून प्रेरणा घ्यावी. आजच्या धावपळीच्या जीवनात ज्येष्ठ नागरिक आपल्याला थांबायला आणि विचार करायला शिकवतात. ते आपल्याला नात्यांचे महत्त्व समजावून सांगतात. पैशापेक्षा माणुसकी मोठी आहे, हे त्यांच्या जीवनातून कळते. ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिक शेती आणि पारंपरिक ज्ञानाचे रक्षक आहेत. त्यांना पिकांच्या जाती, हवामानाचा अंदाज आणि नैसर्गिक उपाय यांची माहिती असते. त्यांचे हे ज्ञान जतन व्हावे. त्यांनी तरुण शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. त्यांच्या अनुभवातून शेती अधिक समृद्ध होईल. शहरी भागातही ज्येष्ठ नागरिकांचे योगदान मोलाचे आहे. अनेक निवृत्त शिक्षक, डॉक्टर आणि अभियंते समाजसेवेत वेळ घालवतात. ते मोफत शिकवणी घेतात. आरोग्य शिबिरांमध्ये मदत करतात. सामाजिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. त्यांच्या या सेवाभावाचा गौरव व्हावा.

आजीच्या बटव्यात अनेक घरगुती उपाय असतात. सर्दी–खोकल्यासाठी हळदीचे दूध, पचनासाठी ओवा आणि जखमेसाठी हळद यांसारखे उपाय आजही उपयुक्त ठरतात. या उपायांमागे अनेक वर्षांचा अनुभव असतो. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबतच या पारंपरिक ज्ञानाचाही आदर करावा. ज्येष्ठ नागरिकांचे हे ज्ञान पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवावे. त्यांच्या पाककृती, त्यांच्या गोष्टी आणि त्यांची गाणी जतन करावीत. ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले यांच्यातील नाते अत्यंत सुंदर असते. आजी–आजोबा नातवंडांना जीव लावतात. नातवंडे त्यांच्या मांडीवर खेळतात. या नात्यातून मुलांना प्रेम आणि सुरक्षितता मिळते. एकत्र कुटुंब पद्धतीत ही नाती अधिक घट्ट होतात. विभक्त कुटुंबातही आठवड्यातून एकदा तरी ज्येष्ठांना भेटावे. त्यांच्यासोबत वेळ घालवावा. या भेटींमधून दोन्ही पिढ्यांना आनंद मिळतो. ज्येष्ठ नागरिकांसाठी मानसिक आधार अत्यंत महत्त्वाचा असतो. निवृत्तीनंतर अनेकांना रिकामेपण जाणवते. अशा वेळी त्यांना नवीन छंद लावण्यास मदत करावी. बागकाम, वाचन आणि लेखन यांसारख्या गोष्टींमध्ये त्यांना गुंतवून ठेवावे. त्यांना समाजकार्यात सहभागी करून घ्यावे. त्यांच्या मताला महत्त्व द्यावे. त्यांना महत्त्वाचे वाटले की त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यांचे मानसिक आरोग्य सुधारते.

सणासुदीच्या काळात ज्येष्ठ नागरिकांचे स्थान विशेष असते. दिवाळीत त्यांच्या हातून लक्ष्मीपूजन करावे. संक्रांतीला त्यांचे आशीर्वाद घ्यावेत. लग्न आणि मुंज यांसारख्या समारंभात त्यांना प्रमुख स्थान द्यावे. त्यांच्या उपस्थितीने समारंभाला शोभा येते. त्यांच्या आशीर्वादामुळेच कार्य निर्विघ्न पार पडते, अशी आपली श्रद्धा आहे. या परंपरा जपणे म्हणजे संस्कृती जपणे आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आमंत्रित करावे. त्यांनी विद्यार्थ्यांना आपले अनुभव सांगावेत. स्वातंत्र्यलढ्याच्या कथा, जुन्या काळातील शिक्षण पद्धती आणि जीवनातील संघर्ष यांमधून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल. आजचे विद्यार्थी पुस्तकातून इतिहास वाचतात, पण ज्येष्ठांच्या तोंडून तो इतिहास ऐकणे अधिक प्रभावी असते. अशा संवादातून दोन पिढ्यांमधील अंतर कमी होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या परिसरातील एकाकी ज्येष्ठ नागरिकांची काळजी घ्यावी. त्यांना बाजारातून सामान आणून देणे, दवाखान्यात नेणे आणि त्यांच्याशी गप्पा मारणे यांसारख्या छोट्या मदतीतून मोठा आधार मिळतो. शेजारधर्म पाळला तर कोणताही ज्येष्ठ नागरिक एकटा पडणार नाही. हीच खरी माणुसकी आहे.

ज्येष्ठांचा आदर करणे म्हणजे भविष्यासाठी प्रेरणा जपणे आहे. आज आपण त्यांचा आदर करू, उद्या आपली मुले आपला आदर करतील. ज्येष्ठ नागरिक हे कुटुंबाचे छत्र आहेत. त्यांच्या आशीर्वादामुळेच कुटुंबे सुखी राहतात. त्यांचा आदर करणे म्हणजे आपल्या मुळांचा आदर करणे आहे. चला, आजच मनापासून एक सुंदर संकल्प करूया. आपल्या घरातील आणि परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरिकांचा मनापासून आदर करूया. त्यांना पुरेसा वेळ देऊया. त्यांच्याकडून मनापासून शिकूया. त्यांच्या अनुभवाचा खजिना जपूया. ज्येष्ठांचा सन्मान हाच खरा संस्कार आहे. हेच आपल्या समाजाचे खरे सौंदर्य आणि सामर्थ्य आहे. (साभार इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल ते सॅटेलाईटपर्यंत सोन्याचा होतो वापर

सोन्याचा वापर आपल्याकडे फक्त महिलाच करतात. अनेक जण सोन्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात, पण सोन्याचा वापर तुम्ही वापरत असलेल्या मोबाईल, लॅपटॉप यामध्ये केला जातो. सोने हे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञान उद्योगासाठीदेखील खूप महत्वाचे आहे. उपग्रहांपासून स्मार्टफोनपर्यंत अनेक ठिकाणी सोन्याचा वापर केला जातो.



स्मार्टफोनच्या सर्किट बोर्ड, कनेक्टर आणि प्रोसेसरमध्ये सोन्याचा वापर केला जातो. लॅपटॉप आणि कॉम्प्युटरच्या मदरबोर्ड, रॅम मॉड्युल आणि सीपीयूमध्ये सोन्याचा वापर केला जातो. टॅबलेट आणि आयपॅडच्या कनेक्टर आणि इंटीग्रेटेड सर्किटमध्ये सोन्याचा वापर केला जातो.

टेलिव्हिजन सेटच्या सर्किट बोर्ड आणि कनेक्शन पॉइंट्समध्ये सोन्याचा वापर केला जातो. डिजिटल कॅमेऱ्यांच्या अंतर्गत सर्किट्स आणि कनेक्टर्समध्ये खूप कमी प्रमाणात सोने वापरले जाते, पण या उपकरणांमध्ये सोनं कमी प्रमाणात वापरले जाते.

संगणक हार्डवेअरमध्ये अनेक ठिकाणी सोन्याचा वापर केला जातो. मदरबोर्डच्या आत सोन्याचा मुलामा असलेल्या पिन आणि कनेक्टरमध्ये सोन्याचा वापर केला आहे. सीपीयूच्या आत सोन्याचा मुलामा असलेल्या पिनमध्ये देखील वापरले जाते.

मोबाईल नेटवर्क टॉवर्समधील उच्च–फ्रिक्वेन्सी कनेक्टरमध्ये सोन्याचा वापर केला जातो. उपग्रह संप्रेषण उपकरणांच्या रिसीव्हर आणि अँटेनामध्ये सोन्याचा वापर केला जातो.

वैद्यकीय उपकरणांमध्ये सोने वैद्यकीय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या अनेक उपकरणांमध्ये सोन्याचा वापर केला जातो. यामध्ये पेसमेकर आणि डिफिब्रिलेटरचा समावेश आहे. श्रवणयंत्रांमध्येही सोन्याचा मुलामा असलेले कनेक्टर वापरले जातात. सोन्याचा वापर उच्च संवेदनशील सर्किटमध्ये केला जातो.

सोने हे विजेचे चांगले वाहक आहे आणि ते गंजत नाही. विद्युत सिग्नल प्रसारित करू शकते. सर्व हार्डवेअरमध्ये जलद संवाद साधण्यासाठी सर्किट बोर्ड, कनेक्टर आणि मायक्रोचिप्समध्ये सोन्याचा वापर केला जातो.

अंतराळयान हे एक महागडे वाहन आहे. येथे सोन्याचा वापर वीज वाहक म्हणून आणि अनेक आवश्यक वायरिंगमध्ये केला जातो.

# प्रतिभावंत गायक, कलाकार किशोरकुमार

भारतीय चित्रपटसृष्टीचा इतिहास लिहायचा झाल्यास किशोरकुमार या नावाशिवाय तो पूर्णच होऊ शकणार नाही. ६०च्या दशकातील देव आनंदपासून ते ८०च्या दशकातील अनिल कपूरपर्यंतच्या अनेक नायकांना यशाची चव चाखविण्यात किशोरदांचा वाटा मोठा आहे. बॉलीवूडला पहिला सुपरस्टार राजेश खन्ना यांच्या रुपाने मिळाला, त्यामागेही किशोरदांचा खास योडली आवाजच होता हे नाकारून चालणार नाही. या हरहुन्नरी नायक व गायकाचा आज स्मृतिदिन. त्यानिमित्त घेतलेला आढावा...



## निमित्त

गायनात तल्लीन होऊन गाणारा गायक म्हणून किशोर कुमार यांची आबालवृद्धांमध्ये ओळख आहे. किशोरदांनी गाण्यात जीव ओतून त्यांना विविध रंग चढवून मैफिली सजविल्या. चित्रपटातही ते चमकले व अभिनयातूनही किशोरदांच्या स्मृती जिवंत आहेत. बारा वर्षांचे किशोरदा रेडिओवर गाणे ऐकून स्वत: त्याच्या धुनांवर थिरकत होते तसेच चित्रपटामधील गीतांची पुस्तके जमा करून त्यातील गीतांना वेगळ्या शैलीत घरी आलेल्या पाहुण्यासमोर अभिनयासह सादर करत व त्यांच्याकडून बक्षीसही मागून घेत असत.

किशोरदांनी वडीलबंधू दादा मुनी उर्फ अशोककुमार व अनुपकुमार यांचे बोट धरून स्वत:चे नशीब अजमावण्यासाठी चित्रपटातील अभिनयातून करियरचा श्रीगणेशा केला. त्या वेळी चित्रपटसृष्टीत अभिनेत्यांमध्ये सर्व गुण पाहिले जात होते. त्यात अभिनेत्याला गायनाच्या कसोटीमधूनही जावे लागत होते.

१९५० साली आभास कुमार व कुंजालाल गांगुली यांनी किशोर कुमारला 'मुकद्दर'मध्ये काम दिले. त्यात किशोरदाचा रोलही तसा चांगलाच होता, मात्र त्यात त्यांना गायनाची संधी मिळाली नाही. त्यानंतर १९५१मध्ये किशोरदा हे मन्नाडे यांच्यासह गायलेच. १९५६मध्ये नऊ चित्रपट करणारा अभिनेता म्हणून त्यांनी त्यांची नवीन ओळख जगाला करून दिली. किशोरदाने आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपटसृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन व संगीताच्या तालावर थिरकणे या त्रिवेणी कलांचा संगम असलेल्या किशोरदांनी दर्शकांसह श्रोत्यांवर भुरळ घातली. नायकासह गायक यांच्या भूमिकेने तर दर्शकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर त्यांनी मीना कुमारी, वैजयंती माला, निम्मी, कामिनी कौशल, मधुबाला, नूतन, माला सिन्हा व बीना रॉय यांच्यासारख्या नायिकांसोबत चित्रपट केले. अभिनयासह त्यांनी या चित्रपटामध्ये गायनाची दुहेरी भूमिका केल्याने तर त्यांनी त्यांचे नाव यशाच्या शिखरावर पोहचविले. 'मेरा नाम अब्दुल रहमान', 'नखरे वाली', 'कुंएँ मे कुद जाना यार पर शादी मत करना', 'इना मीना डिका', 'हम तो मोहब्बत करेगा', 'पाच रुपया बारा आणा' अशा एक ना अनेक गीतांमधून किशोरदा आपल्यात आहेत.

एके दिवशी अशोक कुमार यांच्या घरी अचानक संगीतकार सचिनदेव बर्मन आले. तेव्हा बाथरुममध्ये असलेल्या किशोरदांचे स्वर त्यांच्या कानी पडले. 'कौन गा राहा है?' असे त्यांनी दादामुनींना विचारले. त्यावर अशोककुमार यांनी मोठ्या गायकाची ओळख करून दिली. तेव्हा बर्मनने 'बाथरूम सिंगर' किशोरदाला ओळखले. तेव्हापासून सुमधुर गीतांचा झरा किशोरदांच्या कंठातून वाहायला प्रारंभ झाला. त्यांनी त्याच्या चित्रपटासाठी केवळ गीते लिहिली नाही, तर संगीतही दिले. 'चलती का नाम गाडी', 'बढती का नाम दाढी', 'जमीन', 'दूर का राही', 'झुमरू' आदी चित्रपट किशोरदांनी दर्शकांना नव्या रूपात दिले. (साभार मराठी वेबदुनिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रात्री झोप लागत नाही? मग करा हा सिक्रेट उपाय

डोळ्यांची काळजी घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे. असं का? कारण आजकाल कोणतंच काम फोनशिवाय होत नाही. फोनने असं काय होतं? आपण किती वेळ फोन हातात घेतो, स्क्रीन टाईम किती असतो याकडे आपण अजिबात लक्ष देत नाही. डोळे हा सर्वांत नाजूक अवयव आहे त्यामुळे त्याची काळजी आवर्जून घ्यायला हवी. काय करता येऊ शकतं? बघूयात...



आजकाल कुठलंच काम मोबाईल, लॅपटॉप शिवाय होत नाही. अगदी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत बरेचजण आपला खूप वेळ स्क्रीनवर घालवतात. चष्मा लागण्याचं हे मुख्य कारण आहे. स्क्रीनटाइम कमी केल्यास सगळं सहज शक्य आहे. तासन्‌तास स्क्रीनसमोर काम करत असाल, तर अर्ध्या तासाच्या अंतराने १० ते २० सेकंद डोळे बंद करून विश्रांती घ्या.

धूम्रपान करू नये हे तर आपण ऐकतच आलोय, पण या धुम्रपानामुळे डोळे सुद्धा कमकुवत होतात हे मात्र फार कमी लोकांना माहितेय. धूम्रपान केल्याने काचबिंदू, मोतीबिंदू यांसारख्या डोळ्यांशी संबंधित आजारांचा धोका वाढतो.

मासे, शेंगदाणे, हिरव्या पालेभाज्या यामुळे डोळ्याचं आरोग्य सुधारतं. चांगला आहार घेतल्यास तो डोळ्यांसाठी खूप चांगला असतो. व्हिटॅमिन ए, ओमेगा ३ फॅटी ॲसिड, ल्युटिन, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई सारखे पौष्टिक पदार्थ डोळ्यांच्या दृष्टीसाठी खूप फायदेशीर असतात.

आपण डोळ्यांच्या तपासणीत हलगर्जीपणा करतो. दर सहा महिन्याला डोळ्यांची तपासणी करायला हवी. वेळच्या वेळी तपासणी केली तर डोळ्यांच्या संबंधित कुठली समस्या असेल तर ती कळून चुकते.

मधुमेह, रक्तदाब या आजारांमुळे डोळ्यांची समस्या उद्भवते. रक्तदाब आणि मधुमेह असेल तर डोळ्यांची दृष्टी कमकुवत होते. डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यावी. या तपासणीत मुख्यत: या दोन आजारांची तपासणी न चुकता करावी.

# ‘दुष्काळी परिस्थितीच्या संकटावर एकजुटीने मात करूया’



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून दुष्काळ निवारणाची कामे प्राधान्याने आणि सर्वांच्या समन्वयातून पूर्ण करा. उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्या. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्या आणि नागरिकांसह जनावरांनाही पाणी उपलब्ध होईल, याची दक्षता घ्या. दुष्काळी परिस्थिच्या या संकटावर मात करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकजुटीने आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश राज्याचे फलोत्पादन मंत्री तथा पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे दुष्काळसदृश परिस्थिती, पीक पाहणी आणि संभाव्य पाणीटंचाईवरील उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.यावेळी जिल्हा परिषद अधिकारी मंगेश वाकडीकर, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री भरत गोगावले म्हणाले, जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत सरासरीच्या तुलनेत ९१.९४ टक्के पाऊस झाला असून, पेरणीचे प्रमाण सुमारे ६० टक्के आहे. पावसाचे आगमन उशिरा झाल्यानंतर पेरणी झाली; मात्र त्यानंतर दीर्घकाळ पाऊस न पडल्याने भातपिकावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. काही भागांत जमिनीला भेगा पडल्या असून, पिकांमध्ये दाणे भरण्याची प्रक्रिया बाधित झाल्याने उत्पादनात ५० ते ६० टयांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. दिसणाऱ्या हिरवळीवरून पिकांची स्थिती चांगली असल्याचा निष्कर्ष काढू नये. पिकांची प्रत्यक्ष स्थिती, दाणे भरण्याची अवस्था आणि उत्पादनातील घट यांचा विचार करून संबंधित अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती नजरेआड न करता अचूक अहवाल शासनाकडे सादर करावेत. दुष्काळसदृश परिस्थितीबाबत पुढील निर्णय घेण्यासाठी हे अहवाल महत्त्वाचे ठरणार असल्याने सर्व यंत्रणांनी सतर्क राहावे, असे निर्देश पालकमंत्री गोगावले यांनी दिले.

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्यावर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाईचा विचार करून डोंगराळ भागासह प्रत्येक तालुक्यातील टंचाईग्रस्त होऊ शकणाऱ्या गावांचा आढावा घ्यावा. कोणत्याही नागरिकाला पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना आतापासूनच कराव्यात. उपलब्ध पाणीसाठ्याचा प्राधान्यक्रमाने पिण्यासाठी, त्यानंतर जनावरांसाठी आणि उपलब्धतेनुसार शेती व उद्योगांसाठी वापर करावा. अनधिकृत मोटारींद्वारे पाणी उपसा होणार नाही, तसेच पाण्याची अवैध विक्री रोखली जाईल, याची दक्षता घ्यावी. उद्योगांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे त्यांनी सांगितले.

संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी लोकसहभागातून वनराई बंधारे उभारावेत. वनतळी, गावतळी, सिमेंट बंधारे आणि जलसंधारणाच्या अपूर्ण कामांना तातडीने पूर्णत्व द्यावे. आवश्यक ठिकाणी पिशव्या, यंत्रसामग्री, मनुष्यबळ आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. नद्या, ओहोळ आणि धरणांमधील पाणीसाठा वाढविण्यासाठी शक्य त्या ठिकाणी गाळ काढण्याची कामे हाती घ्यावीत. उपलब्ध जलस्रोतांतील पाणी वाहून जाण्याऐवजी ते स्थानिक पातळीवर अडवून त्याचा उपयोग विहिरी, कूपनलिका आणि आसपासच्या गावांसाठी होईल, असे नियोजन करावे.जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण असलेल्या पाणीपुरवठा योजनांना गती देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज कमी करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांबरोबरच तातडीच्या उपायांवर भर द्यावा. जलसंधारणाच्या कामांसाठी आवश्यक यंत्रसामग्री सज्ज ठेवावी आणि उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करावा. या कामांसाठी औद्योगिक आस्थापनांचे सहकार्यही घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्काळसदृश परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांच्या उपजीविकेचा प्रश्नही महत्त्वाचा असल्याने जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. रोजगाराची गरज असलेल्या नागरिकांना मागणीनुसार काम उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे. पाणी बचतीबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी.असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.

# भाजप महिला मोर्चाचे अलिबागमध्ये काँग्रेसविरोधात जोरदार आंदोलन



**अलिबाग : प्रतिनिधी**

दक्षिण रायगड जिल्हा भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्ष चित्रा पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजप महिला मोर्चाने सोमवारी (दि.१२) अलिबागमध्ये काँग्रेस विरोधात आंदोलन केले.

अलिबाग येथील भाजपा मुख्यालय येथे हे आंदोलन करण्यात आले.दक्षिण रायगड जिल्हा भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्ष चित्रा पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनात प्रदेश कार्यकारिणी सदस्य मंजुषा कुद्रेमुर्ती, पंचायत समिती सदस्य प्रियदर्शनी पाटील, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष आशा बोराडे, तनुजा पेरेकर आदी या आंदोलनात सहभागी झाले होते.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) ११ विद्यार्थिनींच्या लैंगिक छळ प्रकरणात काँग्रेस खासदार डॉ. अंगोमचा बिमोल अओकेइजाम यांच्यावरील आरोप अधिकृत चौकशीत सिद्ध झाले असून, विद्यापीठाने त्यांना सेवेतून बडतर्फ केले आहे. त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

ज्या व्यक्तीवर विद्यार्थिनींच्या छळाचे इतके गंभीर आरोप सिद्ध झाले आहेत, त्यांना संसदेत लोकप्रतिनिधी म्हणून बसण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही. डॉ. बिमोल अओकेइजाम यांनी खासदारकीचा तात्काळ राजीनामा द्यावा. काँग्रेस पक्षाने त्यांची पक्षातून तात्काळ हकालपट्टी करावी. पीडित विद्यार्थिनींना न्याय मिळण्यासाठी त्यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे, असे चित्रा पाटील यांनी सांगितले.

# सेवा संकल्प अभियानातून पालीत सामाजिक उपक्रमांचा जागर

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्याची काळजी या उद्देशाने पाली नगरपंचायतीच्या वतीने ‘सेवा संकल्प अभियानांतर्गत’ विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना सतरंजी व बैठकीचे वाटप, दिव्यांग लाभार्थ्यांना आर्थिक मदत, पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२६ मधील विजेत्यांचा गौरव आणि मोफत नेत्र तपासणी शिबिराचा समावेश होता. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि पाली नगरपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमांतून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्यासोबतच आरोग्य जागृती व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

**दुर्बल घटकांना साहित्य वाटप; दिव्यांगांना आर्थिक मदत**

पाली नगरपंचायतीच्या सन २०२५-२६ मधील पाच टक्के राखीव निधीतून दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना सतरंजी व बैठकीचे वाटप करण्यात आले. गरजू नागरिकांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. तसेच नगरपंचायतीच्या दिव्यांग निधीतून पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. या मदतीमुळे दिव्यांग व्यक्तींना आर्थिक आधार मिळण्यास हातभार लागणार आहे.



पर्यावरण संवर्धन, भारतीय संस्कृतीचे जतन आणि पर्यावरणपूरक सजावटीला प्रोत्साहन देण्यासाठी पाली नगरपंचायतीतर्फे ‘पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२६’ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी झालेल्यांनी निसर्ग, जैवविविधता, ग्रामीण जीवनशैली आणि कौटुंबिक मूल्यांवर आधारित विविध संकल्पना सादर केल्या.

या स्पर्धेत राजेंद्र दत्तात्रय अबिके यांनी ‘राज्यप्रतीकांचा जागर, जैवविविधतेचा संकल्प’ या संकल्पनेतून प्रथम क्रमांक मिळविला. प्रथमेश गणेश उपाध्ये यांच्या ‘जंगल’ आणि सुरेश यशवंत बेलोसे यांच्या ‘सोन्याची जेजुरी’ या संकल्पनांना विभागून द्वितीय क्रमांक देण्यात आला.

अभिजीत नथुराम शिंदे यांच्या ‘विटा-बांबूचे कौलारू घर’ आणि सागर प्रसाद खंडागळे यांच्या ‘संयुक्त कुटुंब’ या संकल्पनांना विभागून तृतीय क्रमांक मिळाला. तर करण कैलास कदम यांच्या ‘वारली झोपडी’ आणि सदाशिव प्रल्हाद जाधव यांच्या ‘वाराणसी’ या संकल्पनांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि पाली नगरपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. नागरिकांना नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे आणि डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, हा या शिबिराचा उद्देश होता. सामाजिक उपक्रमांसोबतच आरोग्यसेवेला प्राधान्य देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

‘सेवा संकल्प अभियान’ हे नागरिकांच्या गरजांशी निगडित उपक्रम राबविण्याचे माध्यम आहे. दुर्बल घटकांना साहित्य वाटप, दिव्यांगांना आर्थिक मदत, आरोग्यसेवा आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देऊन नागरिकांपर्यंत आवश्यक सुविधा पोहोचविण्याचा नगरपंचायतीचा प्रयत्न आहे. शहरातील नागरिकांना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपंचायत कटिबद्ध असल्याचे नगराध्यक्ष पराग मेहता यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, मुख्याधिकारी किशोर जेठे, नगरसेवक आरिफ मणियार, सुधीर भालेराव, जिगीशा खोडागळे, जुईली ठोंबरे, कल्याणी दपके, स्वप्नाली जाधव, सुनंदा पाटील, प्रशासकीय अधिकारी सोनल शिंदे, अमोल बायकर तसेच नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

# हरवलेल्या बालकाचा नेरळ पोलिसांनी अवघ्या चार तासांत घेतला शोध

## जुन्या घराबाहेर थांबला होता मुलगा

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी केली असून ११ वर्षांच्या बेपत्ता बालकाची शोध अवघ्या चार तासांत लावला आहे. पोलिसांच्या सतर्कता यामुळे त्या बालकाची सुखरूप सुटका झाली असून त्या बालकाला पालकांच्या स्वाधीन करण्यात आला आहे.

नेरळ पोलीस स्टेशन हद्दीतील खांडा-नेरळ गावातून बेपत्ता झालेला ११ वर्षांचा मुलगा नेरळ पोलिसांच्या तत्परतेमुळे अवघ्या काही तासांत सुखरूप पालकांच्या ताब्यात मिळाला आहे. वडिलांच्या रोषाला सामोरे जावे लागेल या भीतीपोटी हा बालक घराबाहेर थांबला होता. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नेरळजवळील खांडा येथील रहिवासी मेहरुनमिसा उस्मान शेख यांनी 'डायल ११२' वर फोन करून माहिती दिली की, त्यांचा ११ वर्षांचा मुलगा मोहम्मद इमरान संध्याकाळी ५:३० वाजल्यापासून बेपत्ता आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नेरळ पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी या गुन्ह्याचा तपास करण्यास सुरुवात केली. परिसरात कसून चौकशी आणि शोधमोहीम राबवली असता, सदर मुलगा त्याच्या जुन्या घराच्या बाजूला असल्याची माहिती मिळाली. पथकाने तातडीने तेथे जाऊन खात्री केली असता, रात्री ९.३० वाजता तो सुरक्षित मिळून आला. चौकशीत समोर आले की, काही कारणावरून वडील रागवतील या भीतीपोटी तो जुन्या घराच्या जवळ येऊन थांबला होता. पोलिसांनी घाबरलेल्या बालकाची समजूत काढून त्याला सुखरूप त्याच्या पालकांच्या ताब्यात दिले.




**भरती - सुरक्षा रक्षक**

पगार : रु. 25,000 - रु. 28,000

**ड्युटी** : 12 तास

**वय** : 21 ते 50 वर्षे

**शैक्षणिक पात्रता**
किमान 10 वी पास

**पद** : सिक्युरीटी गार्ड

**पीएफ/ईएसआयसी/बोनस**

**आठवड्याला 1 दिवस सुट्टी**

**लोकेशन** : अजिवली गाव, पळस्पा फाट्याजवळ पनवेल.

**: संपर्क :**
8082592990
8082592995



**पेण नगरपरिषद, पेण.**
जिल्हा - रायगड

**जाहीर निविदा सूचना २०२६-२७**

पेण नगरपरिषदेच्या भांडार विभागाकडून पुढील कामाकरिता १) डिजिटल बॅनर्स छपाई करुन पुरविणे बाबत. २) पेण नगरपरिषद कार्यालयास लागणारी स्टेशनरी पुरविणे बाबत. ३) पेण नगरपरिषद कार्यालयास लागणारी स्टेशनरी छपाई करुन पुरविणे बाबत. ४) ऑफिस फर्निचर खरेदी करणे बाबत. हया कामांकरिता योग्य त्या अनुभवी व इच्छुक पुरवठादार/ठेकेदार यांचे कडून दिनोंद सिलबंद लिफाफा पध्दतीने जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करणेंत येत आहे. निविदा सादर करणेकरिता दिनांक १३/१०/२०२६ ते दिनांक २२/१०/२०२६ सायं. ५.०० वा. पर्यंत मुदतवाढ देण्यात ये आहे. सदर कामाच्या अटी-शर्ती व कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषद भांडार विभागात कार्यालयीन वेळेत (सुटटीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

जा.क्रं.पेनप/का.७/भांडार/निविदा
प्रसिध्दी/२०२६-२७/१७४८
दिनांक :- १२/१०/२०२६

**सही - XXX**
**(जीवन पाटील)**
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद, पेण.


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू डॉ. विनोद मोहितकर



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद महादेवराव मोहितकर यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या पहिल्या प्र-कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठ सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत प्र-कुलगुरू हे पद नव्याने निर्माण करण्यात आले असून, या महत्त्वपूर्ण पदाची जबाबदारी स्वीकारणारे डॉ. मोहितकर हे विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू ठरले आहेत.

त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने कुलगुरूंशी विचारविनिमय करून सुधारित अधिनियमातील कलम १४अ अन्वये ही नियुक्ती केली आहे. प्र-कुलगुरू हे कुलगुरूंनंतर विद्यापीठातील महत्त्वाचे शैक्षणिक व कार्यकारी अधिकारी असणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक नियोजनापासून गुणवत्ता संवर्धनापर्यंतच्या विविध महत्त्वपूर्ण बाबींमध्ये त्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

डॉ. मोहितकर यांना तंत्रशिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय आणि शैक्षणिक कामकाजाचा २५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. महाराष्ट्र राज्याचे तंत्रशिक्षण संचालक म्हणून ही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नेरे, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७६ | -- | ०-२९-६०<br>पो.ख. ०-०१-८०<br>**एकूण ०-३१-४०** | ४.९४ | श्री. अनिल बाळकृष्ण गोवारी |

वरील मिळकतीचे एकूण क्षेत्र ०-३१-४० हे.आर.चौ.मी. पैकी श्री. अनिल बाळकृष्ण गोवारी यांचे हिश्याचे एकूण क्षेत्र ०-१०-०० हे.आर.चौ मी. आकार १.६७ रू. पैसे

पनवेल.
दिनांक : १२/१०/२०२६.

**सही /-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. ९०२२३१७७७२.



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण “ना हरकत पत्र” मागणी अर्जानुसार नोटीस श्रीमती. इंदुबाई विष्णू काशिद व राजू बारकु चौधरी, राहणार बी-१५०१, भूखंड क्र. १२, सेक्टर-११, घणसोली, नवी मुंबई- ४०० ७०१ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. महाविर लक्स लिव्हिंग एलएलपी तर्फे भागीदार १) नितेश लक्ष्मणलाल सिंघवी २) नरेंद्र कोठारी ३) सुरेश दफ्तारी ४) ललीत दफ्तारी ५) इंदुबाई विष्णू काशिद ६) राजू बारकु चौधरी यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता “ना हरकत प्रमाणपत्रासाठी” मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ४२६९ | ११/०९/२०२६ | पुष्पक नोड | २६ | ३४४ | ५४०.०० चौ.मी. | ६/७/२०२३ | १०/०७/२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ‘‘ना हरकत प्रमाणपत्र’’ देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२४९/२०२६-२७

# सुगंधी अंगण दत्तक योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**



स्वच्छतेसाठी नागरिक, व्यापारी आणि महापालिका प्रशासन एकत्र आले असून सुगंधी अंगण दत्तक योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मार्च २०२६मध्ये वाशी गावातून महापौर सुजाता पाटील यांच्या उपस्थितीत या योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता. आतापर्यंत एक लाखाहून अधिक शहर सेवा लाभार्थ्यांनी स्वयंसेवी सहभागासाठी नोंदणी केल्याची माहिती देण्यात आली आहे.

या चळवळीचा विस्तार करून अधिकाधिक नागरिकांना सहभागी करून घेण्याची गरज उपमहापौर दशरथ भगत यांनी व्यक्त केली. सेवा संकल्प अभियानांतर्गत 'सुगंधी शहर – अंगण दत्तक योजना–२०२६'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वाशी येथे प्रभाग क्रमांक १८ मधील जनसहभाग समन्वयक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत निवासी सोसायट्यांचे पदाधिकारी व सदस्य, व्यापारी, दुकानदार, फेरीवाला संघटनेचे प्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी–कर्मचारी आणि स्वच्छतादूत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बैठकीला आरोग्य समिती सभापती जयाजी नाथ, नगरसेवक निशांत भगत, नगरसेविका प्रीती संदीप भगत, समाजसेवक संदीप भगत तसेच लोकशाहीर व पार्श्वगायक संदेश विठ्ठल उमप उपस्थित होते.

नागरिकांच्या सहभागातून स्वच्छतेची चळवळ अधिक गतिमान होत असल्याचे सांगत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या संकल्पनेतील 'सुगंधी शहर' अभियानाची माहिती नगरसेवक निशांत भगत यांनी उपस्थितांना दिली. शहरातील नागरिक, व्यापारी, फेरीवाले, संस्था आणि विविध आस्थापनांची या अभियानातील भूमिका स्पष्ट करताना स्वच्छता ही केवळ महापालिका प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक घटकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. उपमहापौर दशरथ भगत यांनी मार्गदर्शन करताना प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. नागरिकांना महापालिकेकडून मिळणाऱ्या सेवा–सुविधांच्या अनुषंगाने शहराप्रति आपलेही काही दायित्व आहे, ही भावना प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांनी स्वच्छतेचे पालकत्व स्वीकारून सामाजिक जबाबदारीचे भान जपावे, असे आवाहनही त्यांनी केले. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने मोरबे धरण पूर्ण क्षमतेने भरलेले नाही. त्यामुळे नवी मुंबईकरांनी पाण्याचा वापर जपून करावा आणि पाण्याची संभाव्य टंचाई टाळण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वनमंत्री गणेश नाईक यांनी केले आहे. या आवाहनामागील गांभीर्य नागरिकांनी समजून घेऊन पाणी बचतीला प्राधान्य द्यावे, असेही उपमहापौर भगत यांनी नमूद केले.

बैठकीदरम्यान सुगंधी शहर अभियानाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी जनजागृतीपर पथनाट्यही सादर करण्यात आले. नागरिक, लोकप्रतिनिधी, व्यापारी आणि महापालिका प्रशासन यांच्या समन्वयातून स्वच्छतेची ही चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वारली चित्रकलेतून संस्कृती जतन

## आशा कोकणे यांना मानद डॉक्टरेट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



वेदांत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा व जनशिक्षण संस्थान रायगडच्या प्रशिक्षिका आशा विजय कोकणे यांचा नुकताच दिल्ली येथे युरो एशियन विद्यापीठाद्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय दीक्षांत सोहळ्यात पुरस्कार वितरण कार्यक्रमात गौरव करण्यात आला. विविध विषयांवर १५००पेक्षाही अधिक वारली चित्रनिर्मितीतून महाराष्ट्र व भारत देशाची प्राचीन हस्तकला संस्कृती जतन, लेखन व संशोधनासाठी त्यांना मानद डॉक्टरेट देऊन सर्वोच्च आंतरराष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.

अर्थशास्त्र विषयात उच्च पदवीधर असणाऱ्या आशा विजय कोकणे या हाडाच्या शिक्षिका आणि प्रशिक्षिका आहेत. थोर सामाजिक कार्यकर्ते व बिझनेस मॅनेजमेंटचे गुरू हिरामण कोकणे व मार्गदर्शक सल्लागार सुमन कोकणे यांच्या त्या सूनबाई असून भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाच्या जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक विजय कोकणे यांच्या त्या पत्नी आहेत. वेदांत बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गरीब–गरजू विद्यार्थ्यांसाठी बाल संस्कार वर्ग, स्वल्पदरात शिक्षण–प्रशिक्षण व मार्गदर्शनाचे कार्य त्या करीत असून अनेक समाजोपयोगी उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबवित आहेत.त्या एक निष्णात वारली चित्रकार असून भारतात व भारताबाहेर अनेक देशांमध्ये त्यांच्या वारली चित्रकलेला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.

१५०० पेक्षाही जास्त वारली चित्रकलेच्या डिझाईन्स त्या वेगवेगळ्या प्रकारच्या नॅचरल बेसेसवर निर्मित केल्या असून भारताची अति प्राचीन संस्कृती वारली चित्रकलेच्या माध्यमातून देश–विदेशात पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. नितीन गांधी प्रकाशित व आशा विजय कोकणे निर्मित वारली चित्रकलेवर आधारित संशोधन पुस्तिकेच्या व वारली चित्रकलेच्या माध्यमातून त्या हे कार्य करीत असून सदर संशोधन पुस्तिकेचे विशेष कौतुक विद्यापीठाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. भविष्यात त्यांची वारली चित्रकला ॲमेझॉनसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, रमेश बैस, रामभाऊ नाईक, लोकसभा स्पीकर सुमित्रा महाजन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, धर्मेंद्र प्रधान, किरीट सोमय्या, मेधा सोमय्या, नितीन गांधी यांसह अनेक कंपन्यांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी व देश–विदेशातील प्रतिष्ठित व्यक्तींनी त्यांच्या वारली चित्रकलेतील कलाकृतींचे विशेष कौतुक केले आहे.

# चिरनेरमध्ये जाळ्यात अडकलेल्या अजगराला सर्पमित्राकडून जीवदान



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील रहिवासी गजानन काळू वशेणीकर यांच्या शेतात कंपाऊंडसाठी लावलेल्या जाळ्यात १२ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ फूट लांबीचा इंडियन पायथॉन जातीचा अजगर अडकला होता. सर्पमित्र राजेश पाटील यांनी जाळी कापून त्याला सुरक्षितरित्या पकडून जीवदान दिले.

नवरात्रोत्सवात सकाळच्या सुमारास गजानन वशेणीकर शेतावर फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्यावेळी शेतातील कंपाऊंडसाठी लावलेल्या जाळ्यात एक अजगर अडकल्याचे त्यांना आढळून आले. मरणासन्न अवस्थेतही सुटकेसाठी अजगराची धडपड सुरू असल्याचे पाहून गजानन वशेणीकर यांनी या घटनेची माहिती सर्पमित्राला दिली. माहिती मिळताच सर्पमित्र राजेश पाटील यांनी शेतावर धाव घेतली. त्यांना इंडियन पायथॉन जातीचा अजगर शेतातील कंपाऊंडसाठी लावलेल्या जाळ्यात अडकल्याचे आढळून आले.

जाळ्यातून सुटकेसाठी धडपड करीत असलेल्या अजगराची सर्पमित्र राजेश पाटील यांनी चाकू, कात्रीने जाळी कापून इजा होणार नाही याची दक्षता घेत शिताफीने सुटका केली. त्यानंतर त्याला बापूजी देवालयाच्या जंगलातील नैसर्गिक मुक्त अधिवासात सोडून देण्यात आल्याची माहिती राजेश पाटील यांनी दिली.

# मोरबे धरणातील गाळाचा प्रश्न गंभीर

## शास्त्रीय सर्वेक्षणाची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

जलसुरक्षेचा प्रश्न गंभीर होत असताना मोरबे धरणातील साचलेल्या गाळाचे शास्त्रीय सर्वेक्षण करून तो काढण्याच्या शक्यतेचा अभ्यास करण्याची मागणी नॅटकनेक्ट फाउंडेशनने नवी मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे. महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांना दिलेल्या निवेदनात नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी धरणाची सध्याची साठवण क्षमता, गाळाचे प्रमाण आणि गाळ काढण्याची व्यवहार्यता निश्चित करण्यासाठी शास्त्रीय सर्वेक्षण आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या माहितीनुसार माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या महापालिकेच्या उत्तरात मोरबे धरण महापालिकेच्या ताब्यात आल्यापासून जवळपास २५ वर्षांत त्यातील गाळ काढण्यात आलेला नसल्याचे नमूद आहे.केंद्र सरकारच्या गाळ व्यवस्थापनविषयक राष्ट्रीय मार्गदर्शक चौकटीत गाळ साचल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता कमी होत असल्याचे मान्य करण्यात आले आहे. गाळाचे प्रमाण आणि जलाशयाची खोली निश्चित करण्यासाठी शास्त्रीय सर्वेक्षणासह नियमित निरीक्षण करण्याची शिफारस करण्यात आली आहे. मोरबे धरणातील घटत्या पाणीसाठ्याबाबत, पाणीपुरवठ्यातील व्यत्ययाबाबत आणि विकासकांकडून कथित अनधिकृत पाणी उपशाबाबत आमदार मंदा म्हात्रे यांनी चिंता व्यक्त केल्यानंतर जलसुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या निवेदनात नमूद केलेल्या महापालिकेच्या आकडेवारीनुसार मे २०२५ मध्ये मोरबे धरणाची निर्धारित साठवण क्षमता १९०.८९० दशलक्ष घनमीटर असताना प्रत्यक्ष पाणीसाठा ८२.५५७ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ४३.२४ टक्के होता. एका महिन्याचा आपत्कालीन साठा बाजूला ठेवल्यानंतर वापरण्यायोग्य पाणी ५१.९५७ दशलक्ष घनमीटर म्हणजेच २७.२२ टक्के उरत होते. सध्याची स्थिती समजण्यासाठी नॅटकनेक्ट फाउंडेशनने अद्ययावत आकडेवारी मागितली आहे.धरण पूर्ण भरलेले असताना गाळ काढणे कठीण होते. त्यामुळे जलाशयातील पाणी उतरलेल्या भागांत साचलेला गाळ काढता येईल का, याचा महापालिकेने अभ्यास करावा. गाळाचे प्रमाण, प्रत्यक्ष वापरण्यायोग्य पाणीसाठा आणि गाळ काढण्याची व्यवहार्यता शास्त्रीय सर्वेक्षणातून निश्चित केली पाहिजे, असे कुमार म्हणाले.

# महापौर सुजाता पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

## ■ ९४ रक्तपिशव्यांचे संकलन



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत युवा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आणि गणेश नाईक ब्लड डोनर चेन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ९४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून या सामाजिक उपक्रमाचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्ताचा तुटवडा भासू नये, या उद्देशाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. अनेक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने शिबिरात सहभागी होत रक्तदान केले.

# बालवाडी शिक्षिका, मदतनीसांच्या वेतनवाढीची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांची वेतनवाढ करण्याची मागणी श्रमिक सेनेच्या वतीने महापौर सुजाता पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने एका शिष्टमंडळाने महापौरांना नुकतेच एक निवेदन दिले आहे. यावेळी शिष्टमंडळात श्रमिक सेनेचे अध्यक्ष राजू सिंग, सचिव रुपाली कुमावत, चरण जाधव यांसह अन्य पदाधिकारी व बालवाडी शिक्षिका, मदतनीस उपस्थित होत्या.

निवेदनात म्हटले आहे की, मागील सात वर्षांपासून मानधनात वाढ झाली नसल्याने सध्याच्या महागाईच्या काळात तुटपुंज्या मानधनात भागत नाही. त्यामुळे या बालवाडी शिक्षिका व मदतनीसांच्या मानधनात वाढ करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



# दुर्गामाता दौड (माळ दुसरी)

**पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत नवीन पनवेल, से. ७, पोलीस मैदान येथे श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली होती. श्री राजमाता आई जिजाऊंनी शिवप्रभू पोटात असताना नवरात्रात अखंड नऊ दिवस आई श्री तुळजाभवानीचा केलेला जागर, जगदंबेच्या चरणी देश–देवा–धर्मासाठी मागितलेले वरदान व आशीर्वाद, तेच पुनर्रूपी मागण्याची प्रथा म्हणजे श्री दुर्गामाता दौड. मागील ४० वर्षांपासून संभाजी भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी ही दौड निघत आहे. नागरिकांनी आपल्या भागात होणाऱ्या श्री दुर्गामाता दौडमध्ये नक्की सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**





गव्हाण–कोपर हायस्कूल शिक्षिका वृंद



नवरात्र उत्सव देवी दर्शन महिला मंडळ ग्रुप, खोपोली



एपेक्स हॉस्पिटल, कांदिवली

# भाविकांचे श्रद्धास्थान नांदाई माता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह उरण भागातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेली नांदाई माता नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध आहे. उलवे, कोंबडभुजे, तरघर, मोहा आणि गणेशपुरी या पाच गावांतील ग्रामस्थांचे हे श्रद्धास्थान असून देवीच्या प्राचीन मंदिराची स्थापना नेमकी कधी आणि कोणी केली, याची निश्चित माहिती उपलब्ध नसली तरी अनेक पिढ्यांपासून ग्रामस्थांकडून देवीची भक्तिभावाने पूजा–अर्चा केली जात आहे.

पूर्वी जुन्या विटा, दगड आणि मातीपासून बांधलेल्या मंदिराची रचना वैशिष्ट्यपूर्ण होती. सुरुवातीला उलवे, कोंबडभुजे, तरघर आणि मोहा या चार गावांतील ग्रामस्थ देवीची सेवा करीत असत. त्यानंतर गणेशपुरी गाव वसल्याने नांदाई मातेचा उल्लेख पाच गावांची देवी म्हणून रूढ झाला. आजही या पाचही गावांतील भाविकांची देवीवर अपार श्रद्धा आहे.नांदाई मातेची वार्षिक यात्रा चैत्र महिन्यातील शुद्ध सप्तमीला भरते. या यात्रेत परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात. नवरात्रोत्सवही मंदिरात भक्तिभावाने साजरा केला जातो. संततीप्राप्ती, आजारपणातून मुक्तता तसेच कौटुंबिक अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी भाविक देवीला नवस करतात.



नांदाई माता भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते, अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे. नांदाई मातेच्या महात्म्याशी संबंधित अनेक आख्यायिका परिसरात प्रचलित आहेत. देवी रात्री वृद्ध महिलेचे रूप धारण करून गावांमध्ये फेरफटका मारत असे, अशी कथा ग्रामस्थ सांगतात. तसेच मीठाने भरलेल्या ट्रकच्या चालकांनी देवीला मालाबाबत खोटी माहिती दिल्यानंतर त्यांना आलेल्या अनुभवाची कथाही परिसरात सांगितली जाते. नांदाई माता ही पांडवांची बहीण होती, अशीही स्थानिक श्रद्धा आहे. या आख्यायिकांमुळे देवीविषयीची श्रद्धा पिढ्यान्‌पिढ्या जपली गेली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांतील भाविकांना आपल्या श्रद्धास्थानाचे दर्शन घेता यावे, यासाठी उलवे नोडमध्ये सिडकोच्या आर्थिक साह्याने नांदाई मातेचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामुळे पाच गावांतील ग्रामस्थांना आपल्या धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि श्रद्धेशी जोडलेले राहण्यासाठी एक महत्त्वाचे केंद्र उपलब्ध झाले आहे. आधुनिक विकासाच्या वाटचालीत गावांचे मूळ स्वरूप बदलले असले तरी नांदाई मातेवरील ग्रामस्थांची श्रद्धा आजही कायम आहे. त्यामुळे नांदाई माता ही केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून पाच गावांच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक एकतेची ओळखही बनली आहे.

# स्व. नाना पाटेकर यांना पद्मभूषण पुरस्कार देण्यासाठी पाठपुरावा करणार -खासदार तटकरे

**मुरुड : प्रतिनिधी**

आपण येत्या काही दिवसात अभिनेते नाना पाटेकर यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात यावे अशी मागणी केंद्र व राज्य सरकार करणार असल्याचे महत्वपूर्ण प्रतिपादन रायगड रत्नागिरी लोकसभेचे खासदार सुनील तटकरे यांनी केले आहे. मुरुड शहरात दरबार हॉल येथे स्वर्गीय नाना पाटेकर यांची शोक सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते आपल्या मार्गदर्शन भाषणात आपले विचार व्यक्त करताना बोलत होते





खासदार सुनील तटकरे आपल्या भाषणात म्हणाले की,नाना पाटेकर यांनी आपल्या कसदार अभिनयातून संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले होते. अभिनयाबरोबरच त्यांनी समाजाची समाज सेवा सुद्धा केली आहे. दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे त्याच बरोबर आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना दत्तक घेऊन त्यांचा शैक्षणिक खर्च उचलणे नाम फाउंडेशन च्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाण्याचे स्तोत्र उभारून देण्यास मदत करणे अशी अनेक विविध सामाजिक कामे सुद्धा त्यांनी केली आहेत. म्हणूनच आपण येत्या काही दिवसात अभिनेते नाना पाटेकर यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात यावे अशी मागणी केंद्र व राज्य सरकार करणार असल्याचे महत्वपूर्ण प्रतिपादन त्यांनी केले .

मुरुड येथे आयोजित शोकसभेत खासदार सुनील तटकरे भावूक झाले. नाना पाटेकर यांच्या अभिनय, राष्ट्रभक्ती आणि समाजसेवेतील योगदानाचा गौरव करताना, केंद्र सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करावे, तसेच मुरुडमध्ये त्यांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य स्मारक उभारण्यासाठी सर्वोत्परी मदत करणार असल्याचे यावेळी त्यांनी जाहीर केले.

या शोकसभेला नगराध्यक्षा आराधना दांडेकर,माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, श्रीकांत सुर्वे, मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष फैरोज घलटे , सोशियल मिडिया सेल चे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन,मनोहर बैले,नगरसेवक मनोज भगत,प्रमोद भायदे,अजित कासार,मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, तुकाराम पाटील,विजय गिदी,विजय पैर ,मृणाल खोत, पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे,वासंती उमरोटकर, नगरसेविका प्रीता चौलकर, नगरसेविका प्रांजली मकु, नगरसेविका –प्रमिला माळी,माजी सभापती स्मिता खेडेकर ,नंदा आरेकर , मंगेश दांडेकर,मुरुड तालुका काँग्रेस आय अध्यक्ष प्रीतम पाटील आदिंसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नागरिक आणि नानांचे जिवलग मित्र नातेवाईक उपस्थित होते.

नगराध्यक्षा आराधना दांडेकर, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर,मनोहर बैले, श्रीकांत सुर्वे,मनोज भगत, संजय गुंजाळ तुकाराम पाटील यांनी नानांच्या विषयी मनोगत व्यक्त करुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी नाना पाटेकर यांना पुष्प गुलाब अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. चित्रकार महेंद्र पाटील यांनी स्वतः रेखाटलेले नाना पाटेकर यांचे चित्र खासदार सुनील तटकरे यांना भेट दिले.

प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता गरजूंच्या मदतीसाठी धावून जाणे, हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती.नानांच्या जीवनप्रवासाची माहिती भावी पिढ्यांना मिळावी आणि तरुणांना प्रेरणा मिळावी, यासाठी मुरुडमध्ये भव्य स्मारक उभारण्याची .नानांचे विचार आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले आहे.

# सनी यादव भाजपच्या पुणे पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या प्रचारकपदी

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे खालापूर तालुकाध्यक्ष सनी यादव यांची पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या लोणावळा – नाणे मावळ तालुका प्रचारकपदी निवड करण्यात आली आहे. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्या पक्षसंघटनेतील कार्याची, संघटन कौशल्याची आणि राजकीय क्षेत्रातील अनुभवाची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. या निवडीमुळे खालापूर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सनी यादव हे खालापूर तालुक्यात भाजपचे संघटनात्मक कामकाज सक्रियपणे सांभाळत असून पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. स्थानिक पातळीवर पक्षसंघटना मजबूत करणे, कार्यकर्त्यांशी समन्वय राखणे आणि पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेणे, या माध्यमातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

पक्षसंघटनेतील त्यांचा दांडगा अनुभव, कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क आणि संघटनात्मक कामाची हातोटी लक्षात घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर लोणावळा – नाणे मावळ तालुक्याची जबाबदारी सोपवली आहे. पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या अनुषंगाने पक्षाचे संघटनात्मक काम अधिक प्रभावीपणे राबविणे, पदवीधर व शिक्षक मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविणे तसेच स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे, अशी जबाबदारी त्यांच्या भूमिकेत महत्त्वाची ठरणार आहे.

राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रात काम करताना कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका सनी यादव यांनी सातत्याने जपली आहे. त्यांच्या याच अनुभवाचा आणि संघटन कौशल्याचा उपयोग आगामी काळात पक्षाच्या कामकाजासाठी होणार असल्याचे मानले जात आहे. तर सनी यादव यांची प्रचारकपदी निवड झाल्याची माहिती समोर आल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून खालापूर तालुक्यातील पक्षसंघटनेत सक्रिय भूमिका बजावत असताना आता लोणावळा – नाणे मावळ तालुक्यातही त्यांना काम करण्याची संधी मिळाली आहे. या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून पक्षसंघटनेचे काम अधिक व्यापक करण्यावर त्यांचा भर राहणार आहे.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.११) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३६४ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून ३,७३,०००/– रुपये इतका दंड आकारला आहे.

# गौरव नवदुर्गांचा सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांचा होणार सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड–रसायनी रोडवरील मातोश्री संकुल, रीस मोहोपाडा येथील दुर्गामाता मंदिरात स्व. बहिणाबाई उकर्डाजी दुधे यांच्या स्मरणार्थ रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर ते मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दुर्गामाता नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या २६ वर्षांपासून दुधे परिवाराच्या वतीने हा उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात येत असून, धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रम, अन्नदान आणि ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहन देण्याची परंपरा जपली जात आहे.

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून दुधे बिल्डर आणि साहस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'गौरव नवदुर्गांचा' या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रसायनी परिसरातील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा या सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे.

'समाजसेवेला सलाम कर्तृत्वाचा गौरव नवदुर्गांना मानाचा मुजरा!' या संकल्पनेतून महिलांच्या कार्याचा सन्मान करून समाजापुढे त्यांच्या योगदानाचा आदर्श ठेवण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. महिलांच्या सामाजिक योगदानाला प्रोत्साहन देतानाच त्यांच्या कार्याची दखल घेण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न ठरणार आहे.

दुधे परिवाराने धार्मिक कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपली आहे. 'अन्नदान हेच श्रेष्ठदान' ही भावना मनात ठेवून गेल्या २६ वर्षांपासून गोरगरीब आणि गरजू व्यक्तींना अन्नदान करण्याबरोबरच वृद्धाश्रमांनाही मदत केली जात आहे. नवरात्रोत्सवादरम्यान भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करून सेवाभावाची ही परंपरा पुढे नेली जाते.दुर्गामाता मंदिराच्या माध्यमातून नवरात्रोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

# पालीच्या श्री राज एज्युकेशन सेंटरमध्ये मोफत आरोग्य तपासणी

**पाली : प्रतिनिधी**

श्री राज एज्युकेशन सेंटरमध्ये आयोजित मोफत आरोग्य तपासणी व हृदय मूल्यांकन शिबिरातून महत्त्वपूर्ण वैद्यकीय निष्कर्ष समोर आले. दोन दिवसांत ९५० शाळकरी मुलांसह एकूण १ हजार ३१२ जणांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २२ मुले आणि १५ प्रौढ व्यक्तींना जन्मजात हृदयविकार असल्याचे आढळले. संबंधितांना पुढील तपासणी आणि उपचारांचा सल्ला देण्यात आला. या शिबिरामुळे वेळेवर आरोग्य तपासणी आणि हृदयविकाराचे निदान यांचे महत्त्व अधोरेखित झाले.



८ व ९ ऑक्टोबर रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री राज मेडिकल अँड हेल्थ केअर सेंटरच्या वतीने परिसोह फाउंडेशन प्रा. लि. (वन हार्ट) चे प्रमुख डॉ. अनिल पोतदार आणि वनलाईफ चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख रूपेश गांगर व जतीन फुरिया यांच्या सहकार्याने हा आरोग्य उपक्रम राबविण्यात आला.

शिबिरात एसपीओटू (रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण), रक्तदाब, रँडम ब्लड शुगर (रक्तातील साखरेचे प्रमाण), ईसीजी आणि २डी इको यांसारख्या महत्त्वपूर्ण वैद्यकीय तपासण्या मोफत करण्यात आल्या. शाळकरी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थ आणि अन्य लाभार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळाला.

तपासणी झालेल्यांमध्ये ९५० शाळकरी मुले, ५३ शिक्षक आणि ३४ कर्मचारी यांचा समावेश होता. याशिवाय चाकरी–पूरो–अगरबत्ती, रिसर्च सेंटर, हाऊसकीपिंग आणि अन्य सुविधांशी संबंधित २२५ कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थ व क्लिनिकमधील रुग्णांची तपासणी करण्यात आली. रिसर्च सेंटरमधील सुमारे ५० रहिवाशांनाही या उपक्रमाचा लाभ मिळाला.

शिबिरादरम्यान करण्यात आलेल्या तपासणीत २२ मुलांसह १५ प्रौढ व्यक्तींमध्ये जन्मजात हृदयविकार आढळून आला. या सर्वांना पुढील वैद्यकीय तपासणी करून आवश्यक उपचार घेण्याचा सल्ला देण्यात आला. या दोन दिवसीय शिबिरात डॉ. हरीश गोशर, डॉ. खुशी वसा, बालरोगतज्ज्ञ डॉ. नीता जगड, अंकिता नहार, चैतन्याबेन रंभिया, हर्ष शहा, जिग्ना देसाई, पंकज ठक्कर, राजुभाई रंभिया, सीमा नागिया आणि स्वीटी लपासिया यांनी निःस्वार्थ वैद्यकीय सेवा व स्वयंसेवी योगदान दिले.

# ब्रिटिश काळापासून पोलीस मानवंदनेची परंपरा!

## रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज देवघटी बसले ; नवरात्रोत्सवाला प्रारंभ

**धाटाव : प्रतिनिधी**

ब्रिटिश काळापासून पोलिस मानवंदना देण्याची परंपरा लाभलेल्या देशातील दोन देवस्थानांपैकी एक असलेले रायगडवासीयांचे श्रद्धास्थान आणि रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज रविवारी मंगलमय वातावरणात विधिवत देवघटी बसले आणि महाराजांच्या नवरात्रोत्सवास मोठ्या उत्सात प्रारंभ झाले.

रोहा शहराच्या पश्चिमेला हनुमान टेकडीच्या पायथ्याशी श्री धावीर महाराजांचे भव्य मंदिर आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात श्री धावीर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा, वाघबाप्पा आणि मागे तीनवीरा यांची स्थाने आहेत. तर मंदिराबाहेर महाराजांचे अंगरक्षक चेडा देवाचे स्थान आहे.

महाराजांना विधिवत देवघटी बसविण्याच्या सोहळ्यासाठी मंदिरात रोहेकरांनी मोठी गर्दी केली होती. देवस्थानचे पुजारी वरणकर यांनी देवस्थानचे विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो धावीरभक्तांच्या उपस्थितीत महाराजांकडे पारंपरिक पद्धतीने गाऱ्हाणे मांडले. गावातील सर्व भक्तांनी श्रद्धेने नवरात्रोत्सवाचे आयोजन केले असून, उत्सवादरम्यान घडणाऱ्या चुका गोड मानून घेऊन गावाचे सर्व संकटांपासून रक्षण करावे, अशी प्रार्थना त्यांनी केली.



यानंतर महाराजांवर अक्षतांची उधळण करण्यात आली. गोंधळ्यांच्या आरत्या, विविध वाद्यांचा गजर आणि घंटानादाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. मंगलमय वातावरणात ग्रामदैवताची महाआरती संपन्न झाली आणि नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली.

यावेळी आमदार अनिकेत तटकरे, रोहा नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, सरचिटणीस दर्शन कदम, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, सुभाष राजे, समीर सकपाळ, विजयराव मोरे, आनंद कुलकर्णी, प्रकाश पवार, महेश सरदार, संदीप सरफळे, राजेंद्र जैन, आप्पा देशमुख, अमित उकडे, निलेश शिर्के, राजेश काफरे, अजित मोरे, रवींद्र चाळके, परशुराम चव्हाण, राजन पाटील, सूर्यकांत कोलाटकर, शैलेश कोळी, प्रकाश पाटणकर, वैभव साळुंखे, काशिनाथ धाटावकर, स्वप्निल धनावडे, प्रफुल्ल पडवळ, भालचंद्र पवार, प्रशांत देशमुख, आदित्य कोंडाळकर यांच्यासह विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी, उत्सव समितीचे सदस्य आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

माजी आमदार अनिल तटकरे यांनीही सहकुटुंब मंदिरात उपस्थित राहून श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतले.

### पुजारी वरणकरांनी मांडले महाराजांकडे गाऱ्हाणे

"हे धावीर महाराजा, समस्त रोहावासीय ग्रामस्थांनी श्रद्धेने आणि पारंपरिक पद्धतीने तुझा नवरात्रोत्सव मांडला आहे. या उत्सवात आमच्या हातून चांगली सेवा होईल ; काही चुका झाल्यास त्या गोड मानून घे. महाराजा, तुझ्या गावाला सर्व संकटांपासून दूर ठेव आणि समस्त रोहावासीयांवर तुझी कृपादृष्टी कायम राहू दे," असे भावपूर्ण गाऱ्हाणे यावेळी पुजारी वरणकर यांनी श्री धावीर महाराजांकडे मांडले.

# वेणगाव येथील जागृत महालक्ष्मी देवी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकापासुन पुर्वेकडे चार किलोमीटर अंतरावर कर्जत–जांभिवली रस्त्यावर वेणगाव येथे श्री महालक्ष्मी स्वयंभू देवस्थान आहे, हे महालक्ष्मी देवस्थान अति प्राचीन असुन पंचक्रोशीत तसेच मुंबई–पुण्याहून असंख्य भाविक नवरात्रोत्सवात आवर्जून दर्शनासाठी येतात. हे जागृत देवस्थान आहे.



नवरात्रीला श्री महालक्ष्मी मंदीरात उत्सव व यात्रा भरत असल्याचा उल्लेख महाराष्ट्र राज्य गॅझेटियर रायगड जिल्ह्यांतील प्रेक्षणीय स्थळ पान. नं. ८६४ मध्ये आहे, या देवास्थानची आख्यायिका अशी सांगितली जाते की, कोल्हपुरची श्री महालक्ष्मी आपल्या बहिणीस भेटावयास जाताना तिच्या रथाचे चाक घसरले व थोड्याच अंतरावर रथाच्या एका घोड्याचा पाय घसरला, श्री महालक्ष्मी तेथेच वास करुन राहिली, ते ठिकाण म्हणजेच सद्यस्थितीतील असलेले श्री महालक्ष्मी मंदीर होय. देवीच्या रथाचे चाक व घोड्याचा पाय जेथे घसरला ती ठिकाणे मंदीर परिसरात आजही पहावयास मिळतात.

सुमारे दोनशे वर्षापुर्वी वेणगाव येथील एक गावक–याच्या स्वप्नात देवीने येऊन येथे वास करित असल्याचा दृष्टांत दिला व गावक–यांनी तिथे निवारा बांधला व श्री देवीचे दैनंदिन पुजा–अर्चा सांजवात सुरु केली व ती आजतागायत अव्याहतपणे सुरु आहे, काळाच्या ओघात मंदीर जिर्ण झाले होते तसेच भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी या श्रध्दास्थानाचा जीर्णोध्दार १९९७ साली विश्वस्त समितीने केला, देवीचे स्थान स्वयंभू असुन तिच्या नवसाची प्रचिती अनेक भक्तांना आलेली आहे, यामुळे कर्जत पंचक्रोशी तसेच लांब लांबुन भक्तगण श्री महालक्ष्मीच्या दर्शनास अखंड येत असतात, अगदी दररोज चार – पाच किलोमीटर अनवाणी पायांनी येणारांची संख्या सुध्दा मोठी आहे. मंदीर अतिशय रम्य अश्या ठिकाणी आहे, आजुबाजुला डोंगर, शेती, वनश्री असल्याने या परिसरात आल्यावर खुपच प्रसन्न वाटते.

ट्रस्ट तर्फे त्रिपुरा पोर्णिमा, हनुमान जयंती, होळी पोर्णिमा, सीमोल्लंघन व माघी गणेशोत्सव आदी कार्यक्रम केले जातात, नवरात्रीत नऊ दिवस दर्शनासाठी गर्दी होते, नऊ दिवस येथे पुजा सप्तशक्ती पाठ, पठण, अभिषेक, भजन–किर्तन असे कार्यक्रम आयोजित केले जातात, घट उत्थापनाचे दिवशी नवचंडी चा होम केला जातो.

# अलिबाग बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुरेंद्र जोशी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा आणि अलिबाग बार असोसिएशनच्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. सुरेंद्र जोशी बहुमताने विजयी झाले. महिला उपाध्यक्षपदी ॲड. मानसी म्हात्रे यांची बिनविरोध निवड झाली.



रायगड जिल्हा आणि अलिबाग बार असोसिएशनची निवडणूक शुक्रवारी (दि. ९ ) पार पडली. या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. सुरेंद्र जोशी, उपाध्यक्षपदी ॲड. अनंत पाटील, सचिवपदी ॲड. राजेंद्र माळी, सहसचिवपदी ॲड. वैशाली बंगेरा, खजिनदारपदी ॲड. पुष्कर मोकल, हिशोब तपासणीसपदी ॲड. विनोद माळी, तर सदस्यपदी ॲड. हितेश पाटील, ॲड. अजहर घट्टे, ॲड. निवास पाटील, ॲड. मिलिंद साळवकर यांची निवड झाली. महिला सदस्यपदी ॲड. जयमाला पाटील, ॲड. सुलभा पाटील, ॲड. चैताली मगर आणि ॲड. अश्विनी म्हात्रे निवडून आल्या. महिला उपाध्यक्षपदासाठी ॲड. मानसी म्हात्रे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. या निवडणुकीत ५२२ वकिलांनी मतदानाचा हक्क बजावला.

अध्यक्षपदासाठी ॲड. सुरेंद्र जोशी आणि ॲड. जितेंद्र भगत यांच्यात लढत झाली. त्यात ॲड. जोशी यांनी बहुमत मिळवत विजय मिळवला. महिला उपाध्यक्षपदासाठी ॲड. मानसी म्हात्रे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्षपदासाठी ॲड. अनंत पाटील आणि ॲड. दर्शन बैकर यांच्यात लढत झाली. त्यात ॲड. पाटील विजयी झाले. सचिवपदासाठी ॲड. राजेंद्र माळी आणि ॲड. निकेत चवरकर यांच्यात झालेल्या लढतीत ॲड. माळी यांनी बाजी मारली. महिला सहसचिवपदासाठी ॲड. वैशाली बंगेरा आणि ॲड. पल्लवी तुळपुळे यांच्यात लढत झाली. त्यात ॲड. बंगेरा विजयी झाल्या. हिशोब तपासणीसपदासाठी ॲड. सचिन मकाणी आणि ॲड. विनोद माळी यांच्यात लढत झाली. त्यात ॲड. माळी निवडून आले.

# टीम इंडियाचे जोरदार कमबॅक!

## तिसरा टी-२० सामना जिंकून मालिकेत आघाडी

**इंदुर : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसरा टी-२० सामना इंदुरच्या होळकर मैदानात पार पडला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकात सर्व गडी गमवून २२३ धावा केल्या. प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजचा संघ २० षटकांत सात गडी गमावून २०९ धावांपर्यंतच पोहचू शकला. भारताने हा सामना १४ धावांनी जिंकला.



या धावांचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. सलामीवीर शे होप अवघ्या पाच धावांवर अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर कमिल पूरन ४२ आणि शिमरॉन हेटमायर ४३ यांनी डावाला गती देण्याचा प्रयत्न केला. नमन धीरने या दोघांनाही बाद करत विंडीजला मोठे धक्के दिले. कर्णधार रोव्हमन पॉवेल केवळ पाच धावांवर अक्षर पटेलचा शिकार ठरला. मधल्या फळीत शेरफेन रदरफोर्डने ३२ धावा आणि क्वेंटिन सॅम्पसनने २१ धावा करून संघर्ष जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. केमो पॉल १० धावा करून अर्शदीप सिंगचा तिसरा बळी ठरला.

अंतिम षटकांमध्ये शमार स्प्रिंगरने अवघ्या ११ नाबाद ३५ धावांची झंझावाती खेळी केली, तर रोस्टन चेस पाच धावांवर नाबाद राहिला, मात्र तोपर्यंत विजयाचे अंतर पार करणे विंडीजला शक्य झाले नाही. भारताकडून अर्शदीप सिंगने तीन गडी, तर नमन धीरने दोन गडी बाद करत भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

तत्पूर्वी वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात भारताने २२३ धावांचा डोंगर उभारला. भारताच्या या आक्रमक डावाचा मुख्य शिलेदार ठरला तो सलामीवीर अभिषेक शर्मा, ज्याने अवघ्या ३० चेंडूंमध्ये पाच षटकार आणि सहा चौकारांच्या मदतीने ६९ धावांची वादळी खेळी केली. त्याला इशान किशनने १८ चेंडूंत ३७ धावा करत उत्तम साथ दिली.

संजू सॅमसन तीन, आणि कर्णधार श्रेयस अय्यर एक धाव करत स्वस्तात बाद झाल्याने भारताला सुरुवातीला काही धक्के बसले. मधल्या फळीत तिलक वर्माने २८, नितीश कुमार रेड्डीने २१ आणि अक्षर पटेलने २० धावांचे महत्वपूर्ण योगदान दिले. डावाच्या अखेरीस प्रिन्स यादवने सहा चेंडूत नाबाद १३ धावा कुटून भारताला २२०चा टप्पा पार करून दिला. वेस्ट इंडिजकडून शमार स्प्रिंगर आणि रोस्टन चेस यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

## रवींद्र जडेजाचे रणजी ट्रॉफीत दमदार शतक

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारतीय संघातील अनुभवी आणि स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने रणजी ट्रॉफीच्या नवीन हंगामाची दणक्यात सुरुवात केली. सौराष्ट्र आणि छत्तीसगड यांच्यात खेळल्या जात असलेल्या सामन्यात जडेजाने आपल्या बॅटची जादू दाखवत उत्कृष्ट शतकी खेळी साकारली. प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हे त्याचे १६वे शतक ठरले.



२०२६-२७च्या रणजी ट्रॉफीमध्ये जडेजाने सौराष्ट्रकडून खेळताना छत्तीसगडविरुद्ध २०९ चेंडूंमध्ये १०२ धावा केल्या. जडेजाच्या या शतकात १४१ निर्धाव चेंडू होते आणि त्यात केवळ सात चौकारांचा समावेश होता. जडेजाने शतक तर केलेच, त्यासोबत आपल्या शतकादरम्यान अनेक महत्त्वपूर्ण भागीदारीही केल्या. जडेजाने प्रेरक मांकडसोबत २९७ चेंडूंमध्ये पाचव्या विकेटसाठी २०५ धावांची भागीदारी केली, जी सौराष्ट्रसाठी सर्वोच्च भागीदारी ठरली. या भागीदारीदरम्यान प्रेरकनेही शतक झळकावले. त्याने १५० चेंडूंमध्ये १५ चौकार आणि एक षटकारासह १२९ धावा केल्या. त्यांच्या द्विशतकी भागीदारीच्या जोरावर सौराष्ट्रने प्रथम फलंदाजी करताना ३९२ धावा केल्या.

**न्यूझीलंड दौऱ्याआधी दाखवला फॉर्म**

जडेजाने आपल्या डावात मोठे फटके मारण्याऐवजी त्याने एकेरी-दुहेरी धावांवर भर देत अत्यंत जबाबदारीने फलंदाजी केली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याचे हे सातत्यपूर्ण प्रदर्शन सौराष्ट्र संघासाठी अत्यंत निर्णायक आणि महत्त्वपूर्ण ठरले आहे. जडेजाच्या या उत्कृष्ट शतकी खेळीमुळे आगामी आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी तो पूर्णपणे लयीत आणि तयार असल्याचे सिद्ध झाले आहे. न्यूझीलंड दौऱ्यापूर्वी जडेजाने नोंदवलेले हे शतक भारतीय क्रिकेट संघाच्या दृष्टिकोनातून अत्यंत दिलासादायक मानले जात आहे.

## अर्शदीप सिंगने मोडला टिम साऊदीचा विक्रम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात अर्शदीप सिंगने टीम इंडियाला आघाडी मिळवून देताना खास विक्रमाला गवसणी घातली. इंदूरच्या मैदानात धावांचा बचाव करताना त्याने तीन महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. यासह आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये दुसऱ्या डावात सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या जलदगती गोलंदांजाच्या यादीत तो अव्वलस्थानी विराजमान झाला आहे.

डावखुऱ्या हाताच्या जलदगती गोलंदाजाने आतापर्यंतच्या आपल्या कारकिर्दीत दुसऱ्या डावात ८४ विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या आहेत. त्याने न्यूझीलंडच्या टिम साउदीचा विक्रम मोडीत काढला, त्याच्या खात्यात आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये दुसऱ्या डावात ८२ विकेट्सची नोंद आहे.

अर्शदीप सिंगने वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात चार षटकांच्या कोट्यात ४४ धावा खर्च करताना टीम इंडियाकडून सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. धावांचा बचाव करणे अवघड असणाऱ्या खेळपट्टीवर केलेल्या सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर त्याला सामनावीर पुरस्कारानेही गौरविण्यात आले.

## डेन्मार्क ओपनसाठी पी.व्ही. सिंधू सज्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

डेन्मार्क ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या प्रमुख खेळाडूंसाठी यंदाचा ड्रॉ आव्हानात्मक असणार आहे. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू पहिल्याच फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या आणि गतविजेत्या आन से-यंगच्या आव्हानाचा सामना करणार आहे.

पुरुष गटात लक्ष्य सेनला तिसऱ्या मानांकित चो टिएन चेनचा सामना करावा लागेल. तरुण खेळाडू आयुष इंडोनेशियाच्या अल्वी फरहानशी भिडणार आहे. पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी पुनरागमन करण्यासाठी सज्ज आहे. महिला दुहेरीत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद भारतीय आव्हानाचे नेतृत्व करणार आहेत.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये पालकांसाठी क्रीडा स्पर्धा



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये पालकांसाठी बुद्धिबळ, कॅरम आणि टेबल टेनिस या विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाचे नियोजन क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्कूलचे उपशिक्षक हर्षल फडके आणि उपशिक्षिका वृषाली लोखंडे यांनी स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

पालकांमधील क्रीडा गुणांना वाव मिळावा, त्यांना खेळाच्या माध्यमातून आनंददायी अनुभव घेता यावा तसेच स्कूल आणि पालक यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ व्हावा या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिला व पुरुष पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदवून स्पर्धांचा आनंद घेतला.

## विंडीजविरुद्ध अभिषेक शर्माचे वेगवान अर्धशतक

### सॅमसन, कोहलीला टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताने वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात १४ धावांनी शानदार विजय मिळवून मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. या सामन्यात भारताचा स्फोटक फलंदाज अभिषेक शर्माने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतक झळकावून वेस्ट इंडिजविरुद्ध सर्वात जलद अर्धशतक झळकावणाऱ्या खेळाडूचा मान मिळवला आहे.

भारताच्या विजयात अभिषेक शर्माने मोलाचे योगदान दिले. त्याने अवघ्या ३० चेंडूमध्ये ६९ धावांची धडाकेबाज खेळी केली, ज्यामध्ये सहा चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. या कामगिरीसह त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात वेस्ट इंडिजविरुद्ध भारताकडून खेळताना सर्वात जलद अर्धशतक ठोकण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. त्याने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतक झळकावून संजू सॅमसन आणि विराट कोहलीचा विक्रम मोडीत काढला. यापूर्वी यो दोघांनी विंडीजविरुद्ध २१ चेंडूत अर्धशतक केले होते.

याशिवाय आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूंमध्ये दोन हजार धावा पूर्ण करणारा फलंदाज ठरण्याचा बहुमानही अभिषेक शर्माने मिळवला आहे. या डावात फलंदाजी करताना त्याने केवळ १०२४ चेंडूंचा सामना करून हा मोठा टप्पा गाठला आहे.







## झंकार नवरात्रोत्सव











पनवेल : येथील सोसायटी मित्र मंडळांच्या वतीने आयोजित झंकार नवरात्रोत्सवाला पहिल्याच दिवशी तुफान प्रतिसाद लाभला. या महोत्सवाला माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन उपस्थितांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेवक सुमित झुंझारराव तसेच उल्हास झुंझारराव, संजय जैन यांच्यासह अन्य मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते. दांडियामध्ये उत्कृष्ट नृत्य करणाऱ्या विजेत्या खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com